# दत्तकपण #१

## जेफरसनविले, इंडियाना, अमेरिका

## ६०-०५१५संध्याकाळ

1 बरे, ते नेहमीच आहे, जसे मी अगोदर म्हणालो आहे, "'आपण परमेश्वराच्या घराकडे जाऊ,' असे ते मला म्हणाले तेव्हा मला आनंद झाला." मी विश्वास करतो एकदा दाविदाने ते विधान केले, "आपण परमेश्वराच्या घराकडे जाऊ." परमेश्वराच्या घरापेक्षा, अजून कोणते चांगले स्थळ मला ठाऊक नाही असण्याचे, तुम्हाला ठाऊक आहे?

आता, आज रात्री येथे आपल्याकडे खूप दूर वरुन जॉर्जियातून काही मित्र आहेत. ते कदाचित आज रात्रीच्या भोजनानंतर परत जायला निघतील. आणि मग आपण.... त्यातील काही खूप दूर वरुन. मी आशा करतो तुम्ही राहणार आहात. आणि जी काही जागा आमच्याकडे आहे ती तुमच्यासाठी खुली आहे.

आणि मग बुधवार रात्री आपण अभ्यास, निरंतर सुरु ठेवणार आहोत, आणि मग, परमेश्वराची इच्छा असल्यास, परत पुढच्या रविवारी.

2 आणि मग चटावक्राची सुरुवात सहाला होणार आहे. तेव्हा तुम्ही सर्व ज्यांची सुट्टीची योजना आहे.... आपण एक महान, अद्भुत समयाची चटावक्राला अपेक्षा करीत आहोत. तेथेच जेथे आपल्याकडे नेहमी असा आश्चर्यकारक समय असतो. खूप मोठा जमाव नसतो. काही वेळेस आपण.... ते जवळ जवळ ... मला वाटते आपण सहज त्यामध्ये दहा हजारांना जागा करु शकतो. परंतु सहसा ... गेल्या वर्षी मी विचार करतो आपल्याकडे जवळ जवळ सात हजार, त्याच सारखे काहीसे होते. ती गच्च भरलेली जागा होती, परंतु तेथे उभे राहण्यासाठी मुबलक जागा होती, आणि बसण्याची जागा जेथून ते सहज बाहेर धावू शकत होते. आणि म्हणून आपण त्याकडे अपेक्षेने पाहत आहोत.

3 आणि आपल्या कित्येक सेवक भावांना आत पाहून आनंद होत आहे. मी कधीही येथे त्याचे नाव विचार करु शकत नाही, धर्मप्रचारक - भाऊ ह्युमस. आणि बहीण ह्युमस, ते तुम्ही आहात का सरळ येथे बसलेले, आणि मुलेबाळे? आपण त्यांना पाहून आनंदित आहोत. धर्मप्रचारक. दुसरे, भाऊ पॅट, भाऊ डॉल्टन, आणि, ओह, अगदी कित्येक. भाऊ बिलर, आणि अगदी काही क्षणाअगोदर भाऊ कॉलिन्सला पाहिले. आणि, ओह, ह्या सर्वांना संबोधणे एक प्रकारे कठीण आहे. परंतु आज रात्री देवाच्या घरात तुम्हा सर्वांना पाहून आम्ही खूप आनंदित आहोत. हे महान मौल्यवान भाऊ नेविल, माझ्या मागे माझ्याबरोबर प्रार्थना करण्यासाठी बसलेले आहेत जेव्हा आम्ही वचन शिकवणार आहोत.... चार्ली, तुला आणि बहीण नेलीला, मुलाबाळांना, येथे आज रात्री पाहून आनंद होत आहे. हे ... आणि पवित्र शास्त्राचे शिक्षण हे सहसा फार.... होय, भाऊ वेल्च, मी अगदी तुला शोधीत होतो. आता मी तुला मागे बसलेले पाहतो.

4 पवित्र शास्त्राचे शिक्षण हे सहसा थोडेसे धोकादायक असते. थोडेसे, तुम्हाला ठाऊक आहे, जसे काही आपण त्याला म्हणतो, जणूकाही विरळ बर्फावर चालणे. परंतु आम्हाला अगदी असे वाटते की कदाचित, या मुद्यावर आणि या समयाला, हे मी विचार करतो की, मंडळीला, संपूर्ण समजामध्ये, आकलन स्थानात आणणे, की आपण ख्रिस्त येशूमध्ये काय आहोत, हे चांगले होईल. आणि काही वेळेस ... मी विचार करतो की प्रचार करणे ही एक अद्भुत गोष्ट आहे, परंतु काही वेळेस मी विश्वास करतो, भाऊ बिलर, की शिकवणे हे त्या पलीकडे जाते. ते एक प्रकारे ... विशेषकरुन मंडळीसाठी. आता, प्रचार सहसा पाप्याला पकडतो, वचनाद्वारे त्याला दोषात आणतो. परंतु शिकवणे माणसाला तो जो काही आहे तेथे स्थानात स्थानपन्न करते. आणि जोपर्यंत आपल्याला आपण कोण आहोत ते स्थान ठाऊक नाही तोपर्यंत आपल्याकडे योग्य प्रकारचा विश्वास असू शकत नाही.

5 आता, जर युनायटेड स्टेट्स, ही येथील सुंदर भूमीने, मला या राष्ट्राचा राजदूत म्हणून रशियाला पाठविले, मग जर त्यांनी मला अधिकृतरित्या पाठविले रशियाला, सर्व युनायटेड स्टेट्सचा अधिकार जो त्याच्याकडे आहे तो माझ्याकडे असेल. माझा शब्द अगदी जसा काही युनायटेड स्टेट्सचा असेल, जर मला राजदूत म्हणून ओळखले गेले आहे.

आणि मग जर देवाने आपल्याला त्याचे राजदूत म्हणून पाठविले असेल, तर जे काही सर्व स्वर्गात सामर्थ्य असेल, जे काही देवाचे असेल, त्याचे सर्व दूत आणि त्याचे सर्व सामर्थ्य आपल्या शब्दामागे उभे राहील जर आपण योग्यरित्या ... आणि नियुक्त केलेले, लोकांसाठी पाठविलेले दूत असू. देवाला वचनाचा मान राखणे आहे, कारण त्याने ते इतक्या गंभीररीत्या लिहिले आहे की "जे काही तुम्ही पृथ्वीवर बांधाल, ते मी स्वर्गात बांधील. जे काही तुम्ही पृथ्वीवर मोकळे कराल, ते मी स्वर्गात मोकळे करीन. आणि मी तुम्हाला राज्याच्या किल्ल्या देतो." ओह, इतकी महान अभिवचने त्याने मंडळीत दिलेली आहेत.

6 आणि त्या दिवसानंतर, जसे.... तुमच्यातील कित्येकांनी, मी समजून चालतो की या सकाळी येथे होते ते ऐकण्यासाठी जसे मी ते - माझ्या नम्र, साध्या मार्गाने - तो दृष्टांत जो मी स्वर्गाचा पाहिला तो स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला.

मी कधीही कोणत्याही अर्थाने जे कधी कोणी मला सांगितले आहे जे देवाने त्यांना सांगितले आहे त्याबद्दल शंका घेण्याचा प्रयत्न करणार नाही. जरी मी अगदी ते शास्त्रलेखात पाहिले नसेल, तरीही मला त्या भावाच्या शब्दावर विश्वास करावासा वाटेल. मी तरीही अगदी पवित्र शास्त्राबरोबरच राहीन, परंतु मी तरीही विश्वास करीन की कदाचित भावाने तो कोणत्यातरी मार्गाने गैरसमज केला असेल, की त्याने थोडेसे ते मिसळले असेल. आणि तरीही मी त्याला माझा भाऊ म्हणून विश्वास करीन.

7 आणि जर तेथे काहीतरी माझ्या हृदयात प्रज्वलित होत आहे, आणि मी आशा करतो की ते येणाऱ्या वर्षात मला कधीच सोडून जाणार नाही, ते मी गेल्या रविवारी सकाळी जे घडले ते कधीही विसरणार नाही, एक आठवडाभर. त्याने माझ्यामध्ये काहीतरी केले आहे ज्याने माझ्या जीवनात क्रांतिकारक बदल केला आहे. मी घाबरत नाही. माझ्यामध्ये मृत्यूची एकही भीती नाही. मृत्यूचे अजिबात भय नाही. आणि जर तुम्ही फक्त समजलात, ते तुमच्यात ही नसेल. आता, कदाचित जर.... त्याला समजण्यासाठी तुम्हाकडे अनुभव असायला हवा, कारण त्याला स्पष्ट

करण्यासाठी कोणता मार्ग नाही. तुम्ही शब्द शोधू शकत नाही, कारण ते इंग्रजी शब्द कोशात नाहीत, किंवा दुसऱ्या कोणत्या शब्दकोशात नाहीत, कारण ते अनंततेत आहे - काल नाही, उद्या नाही, ते सर्व वर्तमान काळात आहे. आणि ते मला आतापासून एका तासापर्यंत "खूप बरे वाटते," आणि दुसऱ्या तासाला, "इतके बरे वाटत नाही," आणि दुसऱ्या तासाला, "मला परत बरे वाटते," असे नाही. तो सर्वदा वर्तमान काळच आहे, पहा. कधीही संपत नाही, फक्त ती गौरवी शांती आणि काहीतरी....

8 आणि तेथे पाप असू शकत नाही, तेथे मत्सर असू शकत नाही, तेथे आजार असू शकत नाही, तेथे त्या स्वर्गीय किनाऱ्यापर्यंत काहीही पोहोचू शकत नाही. आणि जर हे बोलण्याचे सौभाग्य मला प्राप्त झाले.... जे, मी कदाचित बोलू नये. जर मी बोलू नये, तर मी प्रार्थना करतो देवा मला क्षमा कर. परंतु जर मला सौभाग्य प्राप्त झाले, आणि ते ते होते की देवाने काहीतरी पाहण्यासाठी मला वर घेतले, मी त्याचा पहिला स्वर्ग असा उल्लेख करीन. आणि मग मी विश्वास करतो पवित्र शास्त्रात एक, पौल, या नावाचा, मी विश्वास करतो, जो तिसऱ्या स्वर्गापर्यंत घेतला गेला होता. आणि जर पहिल्या स्वर्गामध्ये ते इतके गौरवी होते, तर तिसऱ्या स्वर्गामध्ये काय असेल? यात आश्चर्य नाही की तो चौदा वर्षापर्यंत त्याबद्दल बोलू शकला नाही! तो म्हणाला की त्याला ठाऊक नव्हते की तो शरीरात होता की शरीराबाहेर होता. ह्या महान प्रेषिताबरोबर - त्याचे कार्यालय विभागायचे नाही, किंवा जसा तो होता तसे काहीतरी बनण्याचा आपल्याला प्रयत्न करायचा नाही - परंतु त्याच्याबरोबर मी बोलू शकतो, मला माहित नाही की मी या शरीरात होतो किंवा शरीराबाहेर होतो. केवळ गोष्ट, ते अगदी इतके वास्तविक होते जसे मी तुम्हाकडे पाहत आहे.

9 आणि मी याबद्दल नेहमी चिंताक्रांत असे जर मी लहानसा तरंगणारा ढग पाहीन, आत्मा, आणि बाजूने जात असेन, आणि म्हणेन, "तेथे भाऊ आणि बहीण जात आहेत - ते चार्ली आणि नेली आहेत. ते भाऊ आणि बहीण स्पेंसर तेथे जात आहेत." ते नेहमीच मला बुचकळ्यात टाकीत असे. जर माझे डोळे कबरेत, क्षय पावत, सडले असतील, जर माझे कान येथे नाहीत अजून जास्त ऐकण्यासाठी, आणि जर माझे रक्त सर्व मागे गेलेले आहे आणि शव रक्षण केलेले आहे, आणि ते पाण्यात आहे किंवा ते भूमीत आहे, आणि मानसिक कार्य क्षमता, माझ्या मेंदूपेशी, सर्व गेलेल्या आहेत, मग कसा काय मी फक्त एक आत्मा तो सभोवार तरंगणारा सोडून काही अधिक होऊ शकतो? ते मला चिंताक्रांत करी.

कसे मला बोलायला आवडते, "हॅलो, भाऊ पॅट, ओह, तुला पाहून खूप आनंद होतो! हॅलो, भाऊ नेविल, कसे मला तुला पाहायला आवडते!" परंतु मी विचार केला, बरे, जर माझ्याकडे पाहण्यासाठी काही नाही, तोंड नाही बोलण्यासाठी (ते सडले आहे, ते माती आहे), मी कसा काय बोलू शकतो, "हॅलो, भाऊ पॅट, हॅलो, भाऊ नेविल," किंवा इत्यादी, आणि "हॅलो, चार्ली"?

10 परंतु आता मला ठाऊक आहे की ते चुकीचे आहे. कारण शास्त्रलेखात असे लिहिलेले आहे, जे काही मी म्हणतो ते विरुद्ध नाही, "कारण जर हा पृथ्वीवरील मंडप मोडला, तर आपल्याकडे एक अगोदरच वाट पाहत आहे." दुसरा मंडप ज्याला डोळे, कान, ओठ, मानसिक कार्यक्षमता आहे. "जर हा पृथ्वीवरील मंडप मोडून टाकण्यात आला...." त्याचे शरीर आहे जे स्पर्श करु शकते, बोलू शकते.

आणि आता ते माझ्याकडे आले, अगदी आता, की मोशे आठशे वर्षांपासून मेलेला होता आणि अचिन्हांकित कबरेत होता, आणि एलीया त्याच्या पाचशे वर्षा अगोदर स्वर्गात गेला होता, परंतु रुपांतराच्या डोंगरावर ते येशूबरोबर बोलताना आढळले.

11 शमुवेलला किमान तीन ते पाच वर्ष झाली होती मरुन, आणि एनदोर येथील भूतविद्या प्रवीण स्त्रीने त्याला वर बोलाविले.... आणि ती उपडी पडली, आणि ती म्हणाली, "तू मला फसविले आहे, कारण तू शौल आहेस, स्वतः," ती म्हणाली, "कारण मी देवांना पाहत आहे!" ती अधार्मिक होती, तुम्ही पहा. "मी देवांना उठताना पाहत आहे."

आणि शौल अजूनही त्याला पाहू शकत नव्हता, आणि तो म्हणाला, "तो कसा दिसत आहे? मला त्याचे वर्णन कर."

म्हणाली, "तो बारीक आहे, आणि त्याच्या खांद्यावर झगा आहे."

म्हणाला, "तो शमुवेल, संदेष्टा आहे. त्याला येथे माझ्यासमोर आण." मला हवे आहे की तुम्ही पहावे की शमुवेलाने त्याचे कोणतेही व्यक्तिमत्व गमावले नव्हते. तो अजूनही संदेष्टा होता. त्याने दुसऱ्या दिवशी तंतोतंत काय घडेल हे शौलाला सांगितले.

तेव्हा, तुम्ही पहा, मृत्यू आपल्याला पूर्णपणे नाहीसे करीत नाही जसे आपण रडतो आणि कबरेवर शोक आणि विलाप करतो. तो केवळ आपले निवास स्थान बदलतो. तो आपल्याला स्थानापासून नेतो.... वय काय आहे? जर मी एक तास अधिक जगलो मी कित्येक सोळा वर्षाच्या व्यक्तीपेक्षा अधिक जगलेला असेन, मी कित्येक पाच वर्षाच्या व्यक्तीपेक्षा अधिक काळ जगलेला असेन. वय काही नाही. आपण येथे काही कारणास्तव, काही करण्यासाठी ठेवले गेलेले आहोत.

12 बरे, आता, यातील कित्येक लहान सुंदर चेहऱ्यांच्या आई ज्या येथे बसलेल्या आहेत, त्यातील काही साठ किंवा सत्तर वर्षे वयाच्या आहेत, त्या म्हणतील, "बरे, भाऊ ब्रॅन्हम, मी काय केले आहे?" तुम्ही तुमची मुले वाढविली आहेत. तुम्ही तेच केले आहे जे तुम्ही करावयास हवे होते.

कदाचित काही वृद्ध वडील येथे बसलेले असतील, म्हणतील, "बरे, मी शेत नांगरले आहे, मी हे केले आहे. मी कधीही प्रचार केला नाही." परंतु तुम्ही अगदी तेच केले जे देवाने तुम्हाला करण्यासाठी पाठविले. तेथे तुमच्यासाठी स्थान आहे.

13 काल, एका वृद्ध डॉक्टरशी बोलत होतो, माझ्या डॉक्टर मित्रांपैकी एक, काहीतरी ऐंशी वर्षे वयाचा. आणि त्याची वहिनी येथे प्रार्थना मंदिरात आज रात्री आहे, आणि ती त्याच्याबद्दल थोडीशी चिंताक्रांत होती. आणि मी त्याला पाहण्यासाठी गेलो. जसे मी त्याच्याशी बोलण्याची सुरुवात केली, त्याचा चेहरा चमकला, त्याने मला कित्येक वर्षाअगोदर कोलोरॅडोमधे गेलेल्या शिकारीच्या सहलीबद्दल सांगितले, अगदी प्रत्यक्ष त्याच भागात जेथे मी शिकार करतो. अगदी इतका तेजस्वी आणि चाणाक्ष! आणि मी म्हणालो, "डॉक्टर, किती काळापासून तुम्ही हा पेशा

करीत आहात?"

तो म्हणाला, "जेव्हा तू स्तनपान करीत होतास तेव्हापासून. आणि खाली...." मी म्हणालो.... "आणि कित्येक वेळेस," तो म्हणाला, "मी माझी घोडागाडी घेऊन; माझ्या घोड्यावर खोगीर घालून; लहानशी पिशवी घेऊन, पेशा केलेला आहे आणि मी चाललो आहे."

आणि मी म्हणालो, "होय, तलावाच्या किनाऱ्यावरुन, पहाटे दोन वाजता, तुझी विजेरी घेऊन, ते घर शोधत असायचे जेथे लहान बाळाला पोटदुखी होती, किंवा आई प्रसूती पीडेत होती."

म्हणाला, "ते बरोबर आहे."

14 आणि मी म्हणालो, "तुम्हाला ठाऊक आहे, डॉक्टर, येथे मर्त्य आणि अमर्त्य याच्या मधील विभागणारी रेषा आहे, त्या पलीकडे मी विश्वास करतो देवाकडे चांगल्या वृद्ध डॉक्टरांसाठी ज्यांनी अशा प्रकारे सेवा केली आहे, त्यांच्यासाठी स्थान आहे."

मोठे अश्रू त्याच्या डोळ्यात आले आणि तो रडू लागला. त्याने त्याचे दुर्बल हात पुढे केले आणि म्हणाला, "भाऊ, मी तशी आशा करतो." भूमिपलीकडे, देव मनुष्याच्या जीवाची पारख करतो, तो काय आहे.

मग मी त्याला हा समाधान करणारा शास्त्रलेख दिला. कित्येक वेळेस, त्या गडद चिखलाच्या शेतात रात्रीच्या समयी नांगरीत, कोणालातरी सहाय्य करण्याचा प्रयत्न करीत, कदाचित त्यासाठी कधीही एक पैसा ही मिळाला नसेल, परंतु ते ठीक आहे.... मी म्हणालो, "येशू म्हणाला शास्त्रलेखात, 'जे दयाळू ते धन्य, कारण त्यांच्यावर दया केली जाईल.'" आणि ते खरे आहे.

15 आणि आज रात्री, या तीन धड्यांमध्ये, आपल्याला मंडळी मांडायची आहे, जर देवाने परवानगी दिली तर, कसे आणि काय पाहायचे, आपण काय आहोत. आपण पौलाच्या इफिस पत्रातील पहिल्या अध्यायाने सुरु करणार आहोत. आणि आपण पहिले तीन अध्याय आपल्या पुढच्या तीन अभ्यासासाठी घेणार आहोत, प्रत्येक संध्याकाळी एक अध्याय घेण्याचा प्रयत्न करणार आहोत, जर आपण करु शकलो. आज रात्री, बुधवार, आणि पुढच्या रविवार सकाळी. इफिस, पहिला अध्याय. आता जसे आपण एकत्र अभ्यास करीत आहोत, मला हे सांगायला आवडेल, की हे इफिसचे पुस्तक तंतोतंत जुन्या करारातील यहोशवाशी समांतर आहे. इफिसकरांस, इफिसकरांसचे पुस्तक.

16 आता, लक्षात ठेवा, जर आपण थोडेसे या तुमच्या अभ्यासावरुन विषयांतर केले तर, अगदी आम्हाला क्षमा करा आणि थोडा वेळाकरिता आमचे सहन करा. आपण ते उघडण्यापूर्वी, त्याला आपल्याला सहाय्य करण्यास विचारु या, जसे आपण आपली मस्तके झुकवितो.

परमेश्वरा, आम्ही तुझ्या पवित्र आणि पूज्य वचनाकडे येत आहोत, जे, सर्व स्वर्ग आणि पृथ्वीपेक्षा अधिक निश्चित आहे. कारण आम्ही या वचनामध्ये वाचतो, ज्याला पवित्र शास्त्र संबोधले जाते, की "पृथ्वी आणि आकाश दोन्ही नाहीशी होतील, परंतु माझे वचन कधीच अपयशी होणार नाही." मग, या गंभीर घडीला मी या उपदेश मंचावर आज रात्री आलेलो आहे, तुझ्या रक्ताद्वारे विकत घेतलेल्या समोर - हे मौल्यवान, प्रिय मर्त्यजन जे आज रात्री येथे बसलेले आहेत, प्रत्येक लहान आशेला कवटाळण्यासाठी जे ते करु शकतात, त्या जीवनाला धरुन ठेवण्यासाठी जे येणार आहे - आज रात्री, ते इतके पुरेसे असू दे, की येथील प्रत्येक विश्वासी त्याचे स्थान पाहिल, आणि प्रत्येक जण जे अजूनही या महान संगतीत आलेले नाहीत ते राज्याकडे वाटचाल करतील, प्रभू, आणि दरवाज्यावर ठोकतील जोपर्यंत रखवालदार दरवाजा उघडीत नाही. हे मान्य कर, प्रभू.

17 येथे आम्ही वाचित आहोत जेथे पवित्रशास्त्र व्यक्तिगत स्पष्टीकरणासाठी नाही. देवा, असे न होवो की मी, तुझा दास, किंवा कोणताही दुसरा दास कधी त्याचे स्वतःचे स्पष्टीकरण वचनात घालण्याचा प्रयत्न करील. आम्हाला ते फक्त वाचू दे आणि विश्वास करु दे ज्याप्रकारे ते लिहिले गेले आहे. आणि विशेषकरुन आम्ही कळपाचे मेंढपाळ, आम्ही पाळक जे कोणे एके दिवशी त्या पलीकडील गौरवी भूमीत त्या लहान कळपाबरोबर एकत्र केले जातील. आणि आम्ही प्रभू येशूच्या उपस्थितीत उभे राहू आणि पाहू की पौलाची पिढी येईल, आणि पेत्राची, आणि लुकाची, आणि मार्क, आणि मत्तय, आणि ते सर्व, आणि तेथे त्यांच्या गटाबरोबर त्यांचा न्याय केला जाईल. देवा, मान्य कर की मी तुझ्या चरणाशी दशलक्ष पारितोषिके ठेवावी जेव्हा मी नम्रतेने रांगत, तुझ्या मोल्यवान पायावर आपले हात ठेवावे, आणि म्हणावे, "प्रभू, ते तुझे आहेत."

18 हे देवा, तुझ्या आत्म्याने, आणि तुझ्या प्रेमाने आणि तुझ्या चांगुलपणाने आम्हाला नव्याने भर. आणि जसे कित्येक वर्षाअगोदर कवीने व्यक्त केले आहे, तसे आम्ही, "प्रिय मरणाऱ्या कोकऱ्या, तुझे मौल्यवान रक्त कधीही त्याचे सामर्थ्य गमावणार नाही, जोपर्यंत देवाची सर्व खंडणी भरलेली मंडळी परत कधीही पाप न करण्यासाठी वाचविली जात नाही. आणि जेव्हापासून विश्वासाद्वारे मी तो तुझ्या घावाद्वारे वाहणारा प्रवाह पाहिला; उद्धारणारी प्रीति हा माझा विषय आहे, आणि मी मरेपर्यंत तो असेल. मग उदात्त, मधुर गाण्यात," तो पुढे म्हणतो, "मी तुझ्या बचावाचे सामर्थ्य गाईन, जेव्हा ही दुर्बल बोबडी, तोतरी जीभ कबरेमध्ये निश्चल पहुडेल." मग कबर तुझ्या मुलांसाठी कोणता मृत्य धरुन ठेवीत नाही. ती केवळ आपली विश्रामाची जागा, किंवा आपली लपण्याची जागा असते, जेथे हे विनाशी त्याने अविनाशीपण परिधान करावे.

आणि आज रात्री आपण हे पहावे, प्रभू, स्पष्टपणे, जसे ते आपल्याला वचनात दिलेले आहे. आम्हाला समज दे. आणि आम्हाला, प्रभू, आमच्या कर्तव्य पदावर, स्थानापन्न कर, की आम्ही तू येईपर्यंत प्रामाणिकपणे सेवा करावी. आम्ही हे येशूच्या नावात, आणि त्याच्याकरिता मागत आहोत. आमेन.

19 आता, इफिस पुस्तक, जसे मी आताच सांगत होतो, माझ्या मताप्रमाणे, ते नव्या करारातील स्वर्गातील एक महान पुस्तक आहे. ते आम्हाला पुढे नेते. जेथे कॅलविनवाद एका डहाळीवर संपतो, आणि अर्मेनियनवाद दुसऱ्या डहाळीवर संपतो, परंतु इफिसचे पुस्तक ते एकत्र

आणते आणि मंडळीला पदावर स्थानापन्न करते.

आता, मी ते यहोशवाबरोबर प्रतीकात्मक केले आहे. जर तुम्ही लक्ष दिले, इस्राएलाला मिसरातून बाहेर आणले गेले, आणि त्यांच्या प्रवासाचे तीन टप्पे आहेत. एक टप्पा मिसराला सोडणे; पुढचा टप्पा अरण्यवास; आणि पुढचा टप्पा कनान होता.

20 आता, कनान सहस्त्राब्दी युगाला दर्शवित नाही. ते केवळ जय प्राप्त करणाऱ्या युगाला दर्शविते, जय प्राप्त करण्याचा कालखंड, कारण कनानात त्यांनी ठार केले आणि जाळले आणि शहरे बळकावली. आणि सहस्त्राब्दीमध्ये मृत्यू नसेल.

परंतु दुसरी गोष्ट जी ती करते, ती विश्वासाद्वारे नीतिमान ठरविते, त्यांनी मोशेमध्ये विश्वास केल्यानंतर आणि मिसर सोडल्यानंतर; अग्निस्तंभाखाली अनुसरुन आणि अरण्यात बलिदानाच्या कोकऱ्याच्या प्रायश्चित्ताद्वारे, पवित्रीकरणानंतर; आणि मग त्या भूमीमध्ये प्रवेश करीत आहेत ज्याचे त्यांना अभिवचन दिले होते.

21 आता, नव्या कराराच्या विश्वासूंना कोणत्या भूमीचे अभिवचन दिले आहे? अभिवचन हे पवित्र आत्मा आहे. "यानंतर असे होईल की शेवटच्या दिवसात [योएल २:२८], मी मनुष्य मात्रांवर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन. तेव्हा तुमचे पुत्र व कन्या संदेश देतील. माझ्या दास व दासीवर मी माझ्या आत्म्याचा वर्षाव करीन, आणि ते संदेश देतील. आणि वर आकाशात मी अद्‌भुते दाखवीन. आणि खाली पृथ्वीवर, अग्निस्तंभ, धूर, आणि वाफ दाखवीन." आणि पेत्र म्हणाला, पेन्टिकॉस्टच्या दिवशी, त्याचा मजकूर घेतल्यानंतर आणि प्रचार केल्यानंतर, "पश्चाताप करा, तुमच्यातील प्रत्येक जणाने, आणि येशू ख्रिस्ताच्या नावाने तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून बाप्तिस्मा घ्या...." - क्षमा होणे, माफ करणे, मागील सर्व अपराध काढून टाकणे.

22 तुम्ही निरीक्षण केले, यहोशवा, त्यांनी यार्देन ओलांडण्याअगोदर, यहोशवा म्हणाला, "छावणीमधून फिरा आणि तुमची वस्त्रे स्वच्छ करा आणि तुमच्यातील प्रत्येकजण शुद्ध व्हा, आणि कोणी पुरुष त्याच्या पत्नीकडे न जावो, कारण तीन दिवसाच्या आत तुम्ही देवाचा गौरव पाहाल." पहा? अभिवचन वारस हक्काने मिळविण्यासाठी ही तयार होण्याची प्रक्रिया आहे. आता, इस्राएलाला अभिवचन होते.... देवाने अब्राहामाला पॅलेस्टाईन भूमीचे अभिवचन दिले होते, आणि ते त्यांचे निरंतरच्या मालकीचे असणार होते, आणि ते या भूमीमध्ये सर्वदा असणार होते.

आता, या वचनदत्त देशात येण्यासाठी, त्यांना तीन पायऱ्या चढाव्या लागल्या. आता लक्ष द्या, ते पूर्णपणे नव्या करारात चिन्हांकित केले आहे.

आता जर हे, जसे मी म्हणालो, तुमच्या काहींच्या विचारांशी असहमत आहे - तुमच्यातील काही मौल्यवान नाजरीन लोक, चर्च ऑफ गॉड, आणि इत्यादी - त्याने दुखावले जाऊ नये, परंतु फक्त लक्ष द्या त्याकडे बारकाईने आणि प्रतिकाला पहा. लक्ष द्या आणि पहा जर प्रत्येक स्थळ अगदी उत्कृष्टरित्या बिनचूक भेटते की नाही.

23 तेथे प्रवासाच्या तीन पायऱ्या होत्या, आणि या प्रवासाच्या तीन पायऱ्या आहेत. कारण आपण विश्वासाद्वारे नीतिमान ठरलो आहोत, प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास केल्याने, मिसराची भूमी सोडल्याने. बाहेर पडलो आणि मग त्याच्या रक्ताच्या अर्पणाद्वारे पवित्र झालेलो आहोत, आपल्या पापांपासून धुतले गेलो आहोत, आणि यात्रेकरु आणि परदेशी झालेले आहोत, असा दावा करीत की आपण एका भूमीची, येणाऱ्या शहराची, किंवा अभिवचनाची, वाट पाहत आहोत.

तसेच इस्राएलाने अरण्यात केले. प्रवासी, विश्रांतीसाठी जागा नाही, अग्निस्तंभाच्या पाठी रात्रंरात्र प्रवास करीत होते, परंतु शेवटी वचनदत्त देशात आले जेथे ते स्थायिक झाले.

24 तथेच जेथे विश्वासू येतो. प्रथम त्याला जाणीव होते की तो पापी आहे; मग तो पाण्याद्वारे वेगळा केला जातो, रक्ताद्वारे जलस्नानाने, आणि ... किंवा, वचनाच्या जलस्नानाने, खरंतर, प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास करण्याने. मग, विश्वासाने नीतिमान ठरल्यानंतर, आणि ख्रिस्ताद्वारे देवाबरोबर शांती आहे, आणि सहभागी होतो, येशू ख्रिस्ताच्या नावात त्याचा बाप्तिस्मा झालेला आहे, त्याला प्रवासामध्ये प्रवेश मिळण्यासाठी. तुम्हाला ते समजले? प्रवासामध्ये! मग तो प्रवासी आणि यात्रेकरु होतो. तो कशाच्या प्रवासात आहे? देवाने दिलेल्या अभिवचनाच्या.

25 इस्राएलाला अजूनही अभिवचन प्राप्त झाले नव्हते, परंतु ते त्यांच्या प्रवासात होते. आणि न उठता.... कृपया समजून घ्या. तेथेच जेथे नाजरीन आणि पिलग्रिम होलीनेस, आणि इत्यादी, अपयशी झाले आहेत. कारण, इस्राएल, जेव्हा ते कादेश बर्ण्याच्या स्थळी आले, जेव्हा हेर पलीकडे गेले आणि म्हणाले, "भूमी उत्तम आहे," परंतु त्यातील काही परत आले आणि म्हणाले, "आपण ती घेऊ शकत नाही, कारण नगरे तटबंदीची आहेत," आणि इत्यादी. परंतु यहोशवा आणि कालेब बाजूला उभे राहिले आणि म्हणाले, "आपण तो जिंकण्यास पूर्णपणे समर्थ आहोत!" त्यांच्या अगोदरच हस्ताक्षर केलेल्या दस्तऐवजाच्या विधानामुळे, त्यांनी कृपेच्या दोन कार्यांवर विश्वास केला होता, नीतिमान ठरणे आणि पवित्रीकरण, आणि अजून पुढे जाऊ शकले नाही. आणि ऐका, ती अखंड पिढी अरण्यात नाश पावली. परंतु दोन जे वचनदत्त देशात गेले होते ज्यांनी तो देश चांगला होता त्याचे पुरावे आणले होते, "आणि आपण तो जिंकण्यास पूर्णपणे समर्थ आहोत, कारण ते देवाचे अभिवचन होते." मग लोकांनी पुढे जाण्याऐवजी, पवित्र आत्मा स्वीकारणे, अन्यभाषा बोलणे, देवाचे सामर्थ्य स्वीकारणे, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा, चिन्हे, अद्‌भुते, चमत्कार, त्यांना असे वाटले की ते त्यांच्या परंपरेची शिकवण मोडतील. आणि त्यामुळे काय घडले? भूमीमध्ये नाश पावले! ते बरोबर आहे.

26 परंतु विश्वासू, कालेब आणि यहोशवा जे वचनदत्त देशात जात होते त्याच्यासाठी साधन झाले, ते भूमीमध्ये पुढे गेले, आणि भूमी प्राप्त केली, आणि मालकी म्हणून, भूमीमध्ये स्थायिक झाले. आणि आपल्याला कधीही नीतिमान ठरणे, पवित्रीकरण यावर थांबायचे नाही. पवित्र

आत्म्याच्या बाप्तिस्म्याकडे जाऊया. येशूवर विश्वास करुन, बाप्तिस्मा घेणे यावर थांबू नका. थांबू नका कारण त्याने आपल्याला पापाच्या जीवनापासून शुद्ध केले. परंतु आता आपल्याला दर्जापर्यंत, पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्यापर्यंत नेटाने जायचे आहे. कारण पेत्र पेन्टिकॉस्टच्या दिवशी म्हणाला, "कारण हे अभिवचन तुम्हाला, आणि तुमच्या मुलाबाळांना, व जे दूर आहेत त्या सर्वांना, म्हणजे जितक्यांना आपला देव परमेश्वर स्वतःकडे बोलावितो तितक्यांना दिला आहे."

27 तेव्हा, इफिस येथे आपल्याला यहोशवाप्रमाणे, पदावर स्थानापन्न करिते. तुम्ही निरीक्षण केले, यहोशवाने, भूमीच्या पलीकडे गेल्यावर, आणि भूमीचा ताबा घेतल्यावर, मग त्याने भूमी विभागली? "एफ्राईम येथे, मनश्शे येथे, आणि हा येथे, गाद येथे, बन्यामीन येथे." त्याने भूमी विभागली.

आणि लक्ष द्या! ओह, हे अगदी आपले हृदय उल्हसित करते! त्यातील प्रत्येक इब्री आया, त्या बाळांना जन्म देताना, तिने प्रत्यक्ष ते स्थळ बोलले, तिच्या प्रसूती वेदनेत, जेथे ते वचनदत्त देशात स्थानापन्न होणार होते. ओह, हा महान अभ्यास आहे! जर आपण केवळ यामध्ये तपशीलवार गेलो, जे तासंतास घेईल. एके दिवशी जेव्हा आपल्याला आपले प्रार्थनामंदिर तयार झालेले मिळेल, मला फक्त येऊन, पूर्णपणे एक किंवा दोन महिने घ्यायचे आहेत, फक्त सरळ यावर राहण्यासाठी. पहा जेव्हा ते, त्यातील प्रत्येक आई.... जेव्हा तिने, "एफ्राईम" संबोधले, जेव्हा ती प्रसूती वेदनेत होती, त्याला त्याच्या विशिष्ट स्थानात जेथे त्याचे पाय तेलात असतील तेथे स्थानापन्न केले - अगदी तंतोतंत त्यातील प्रत्येकजण तेथेच जेथे ते होते!

आणि यहोशवाने, हे माहिती नसताना, प्रेरणेद्वारे, पवित्र आत्म्याने चालविल्याने, वचनदत्त देशात गेल्यानंतर, प्रत्येक माणसाला त्याचे अभिवचन दिले, तंतोतंत त्याच्या जन्माद्वारे मागे तेथे जसे पवित्र आत्म्याने जसे अभिवचन दिले होते.

28 प्रसूती वेदनेद्वारे, कसे काय देवाने काहींना मंडळीमध्ये बसविले आहे! ओह, कधीकधी त्या भयंकर होतात. जेव्हा मंडळी बाहेरील जगताच्या छळाद्वारे आक्रोश करते, प्रभू येशूवर विश्वास करते, की पवित्र आत्म्याचे अभिवचन आपल्याला अगदी तितकेच वास्तविक आहे जसे ते पेन्टिकॉस्टला होते, ते कसे प्रसूती वेदनेमध्ये कण्हले आणि कसा आक्रोश केला! परंतु जेव्हा त्यांचा जन्म झाला, आणि देवाच्या राज्यात दर्जामध्ये जन्मले, मग पवित्र आत्म्याने मंडळीमध्ये काहींना प्रेषित, काही संदेष्टे, काही शिक्षक, काही पाळक, काही सुवार्तिक असे स्थानापन्न केले. मग त्याने तेथे अन्यभाषा, भाषेचा अनुवाद, ज्ञान, शहाणपण, आरोग्याची दाने, सर्व प्रकारचे चमत्कार दिले.

29 मंडळी कुठे आहे (आता हे करण्यामागचा माझा हा उद्देश आहे), मंडळी नेहमी कोणा दुसऱ्याचा कोपरा घेण्याचा प्रयत्न करते. परंतु तसे करु नका. तुम्ही एफ्राईमाच्या कोपऱ्यात कधीही मका उगवू शकत नाही, जर तुम्ही मनश्शे आहात. तुम्हाला ख्रिस्तामध्ये तुमचे स्थान घेणे आहे, ते योग्य स्थितीत घेणे आहे. ओह, ते गहन आणि समृद्ध होते जेव्हा आपण येथे येतो, कसे काय देव मंडळीमध्ये एकाला अन्य भाषेत बोलण्यास ठेवतो, दुसऱ्याला.... आता, आपल्याला कित्येक वेळेस शिकविले गेले आहे की आपल्याला सर्वांना अन्य भाषेत बोलणे आहे. ते चुकीचे आहे. "आपणा सर्वांना ते करणे आहे." नाही, आपल्याला करणे नाही. त्या सर्वांनी एकही गोष्ट केली नाही. प्रत्येक जण....

30 प्रत्येक जागा प्रेरणेद्वारे, विभागली गेली होती, व दिली गेली होती, आणि प्रत्येक जण.... मी शास्त्रलेख घेऊन, तुम्हाला तंतोतंत दाखवू शकतो तुम्हाला की त्याने त्यांना ज्या जागेत ठेवले जेथे ते असावयास हवे होते, योग्य स्थितीत; कसे की अडीच वंशांना नदीपलीकडेच राहणे होते, कसे त्यांच्या आया त्यांच्या बालपणात रडल्या होत्या, आणि कसे प्रत्येक स्थळ असणे होते.

आणि आता तुम्ही आत आल्यानंतर, त्याचा अर्थ असा नाही की तुम्ही युद्धापासून मुक्त आहात. तुम्हाला अजूनही प्रत्येक इंच ज्यावर तुम्ही उभे आहात त्यासाठी लढणे आहे. तेव्हा, पहा, कनान महान स्वर्गाला दर्शवित नाही, कारण तेथे युद्ध आणि संकटे आणि मारणे आणि भांडणे आहेत, आणि इत्यादी. परंतु ते हे दर्शविते, की ते सिद्ध चालणे असावयास हवे.

31 तेथेच जेथे आज मंडळी अपयशी ठरत आहे, त्या चालण्यात. तुम्हाला ठाऊक आहे अगदी तुमचे स्वतःचे वर्तन अजून कोणालातरी बरे होण्यापासून अडखळवू शकते? तुमचे गैरवर्तन तुमच्या विश्वासूंच्या कबूल न केलेल्या पापांचे, या मंडळीला कडवटपणे अपयशी होण्यास कारणीभूत ठरु शकते. आणि न्यायाच्या दिवशी तुम्ही त्या प्रत्येक गोष्टीसाठी जबाबदार असाल. "ओह," तुम्ही म्हणता, "आता भाऊ ब्रॅन्हम, एक मिनिट थांबा." बरे, ते सत्य आहे. त्याचा विचार करा.

यहोशवा, त्याने भूमी ओलांडल्यानंतर, देवाने त्याला अभिवचन दिले की.... फक्त विचार करा, अखंड मोहीम एक ही मनुष्य न गमावता, अगदी ओरखडा ही न पडता, एका ही परिचारिकेशिवाय, किंवा प्रथमोपचारा शिवाय किंवा मलमपट्टी शिवाय लढायची होती. देव म्हणाला, "भूमी तुमची आहे, जा युद्ध करा." मोहीम लढायचा विचार करा, आणि तेथे अजिबात सभोवती रेड क्रॉस नाही. तेथे कोणीही घायाळ होणार नाही.

32 आणि त्यांनी अमोरी आणि हित्ती लोकांना ठार केले, परंतु त्यांच्यामध्ये कोणी एक ही घायाळ झाला नाही जोपर्यंत छावणीत पाप येत नाही. आणि जेव्हा आखानाने तो बाबेली झगा व सोन्याची वीट घेतली, आणि त्याच्या डेऱ्यामध्ये खाली लपून ठेवली, मग दुसऱ्या दिवशी त्यांनी सोळा माणसे गमावली. यहोशवा म्हणाला, "थांबा! थांबा! एक मिनिट थांबा, तेथे काहीतरी चुकीचे आहे! येथे काहीतरी चुकीचे आहे, आपण सात दिवसाचा उपवास करणार आहोत. देवाने आपल्याला अभिवचन दिले आहे की तेथे आपल्याला कोणतीही दुखापत होणार नाही, की आपले शत्रू आपल्या पायावर लोटांगण घालतील. आणि येथे काहीतरी चुकीचे आहे. काहीतरी कुठेतरी चुकीचे घडले, कारण आपल्याकडे येथे सोळा मृत्युमुखी पडलेली मनुष्ये आहेत. ते इस्राएली भाऊ होते, आणि ते मृत्युमुखी पडले आहेत.

33 ते का मेले, निरपराध लोक? कारण एक मनुष्य रेषेबाहेर पडला. तुम्ही पहा कारण काय आहे की हे शिकविले जायला हवे? मंडळी

रेषेमध्ये - देवाच्या वचनाबरोबर रेषेत असणे, देवाबरोबर रेषेत असणे आणि एकमेकाबरोबर रेषेत असणे, पूर्णपणे सरळ चालणे, सर्व लोकांपुढे नम्रतेने, देवाच्या भयात. कारण एका माणसाने झगा चोरला, आणि काहीतरी केले जे त्याने करावयास नको होते, ज्यामुळे सोळा लोकांचा जीव गेला. मी विचार करतो ते सोळा होते, कदाचित अधिक असतील. मी विश्वास करतो ती सोळा माणसे होती जी मृत्युमुखी पडली.

यहोशवाने बोलावले, म्हणाला, "तेथे काहीतरी चुकीचे आहे. देवाने अभिवचन दिले आहे, आणि काहीतरी चुकीचे आहे!"

जेव्हा आपण आपल्यासमोर आजाऱ्याला आणतो, आणि तो बरा होण्यास अपयशी ठरतो, आपल्याला गंभीर उपवासाची, एकत्र जमण्याची गरज आहे. कुठेतरी काहीतरी चुकीचे आहे. देवाने अभिवचन दिले आहे, देवाला त्या अभिवचनाला चिकटून राहणे आहे, आणि ते तो करील.

34 आणि त्यांनी उपोषण आरंभले. आणि त्यांनी शोधून काढले. त्यांनी चिठ्या टाकल्या, आणि आखानाने ते कबूल केले. आणि त्यांनी अखानाचे कुटुंब आणि सर्वस्व मारले, आणि त्यांची राख जाळून, ती स्मारक म्हणून तेथे सोडली. आणि यहोशवा सरळ युद्धाला गेला, ओरखडा न पडता किंवा घाव न होता, सर्वकाही घेतले. तेथे तुम्ही आहात.

35 एक दिवस त्याला थोडा समय, अधिक समय हवा होता. सूर्य खाली चालला होता, रात्रीच्या समयी लोक चांगल्या प्रकारे युद्ध करु शकत नव्हते. यहोशवा, तो महान योद्धा, देवाचा अभिषिक्त, भूमीमध्ये योग्य प्रकारे स्थानापन्न केलेला - जसे नवीन मंडळीसाठी इफिस, भूमीवर ताबा मिळवीत, त्यावर मालकी मिळवीत - त्याला काही समय हवा होता; तेव्हा तो म्हणाला, "सूर्या, स्तब्ध रहा!" आणि सुमारे बारा तासासाठी तो स्तब्ध उभा राहिला, जोपर्यंत त्याने भूमी घेतली नाही. पहा?

36 आता इफिसच्या पुस्तकाने आपल्याला ख्रिस्तामध्ये योग्य स्थानात स्थानापन्न केले आहे जसे ते पवित्र भूमीत होते. आपण पवित्र भूमीत स्थानापन्न झालो नाहीत, परंतु पवित्र आत्म्यात. आता अगदी एक वचन वाचूया, पहा मंडळी कशी सिद्ध आहे.

पौल, येशू ख्रिस्ताचा प्रेषित देवाच्या इच्छेद्वारे....

ओह, मला ते आवडते! देवाने त्याला शिष्य बनविले. कोणी वडिलांनी त्याच्यावर हात ठेवले नाहीत, कोणी बिशपने त्याला कुठे पाठविले नाही, परंतु देवाने त्याला पाचारण केले आणि त्याला प्रेषित बनविले.

पौल, येशू ख्रिस्ताचा प्रेषित देवाच्या इच्छेद्वारे, संतांना [पवित्र झालेले असे] जे इफिसमध्ये आहेत, आणि येशू ख्रिस्तामध्ये विश्वास ठेवणारे....

पहा कसा तो हे संबोधतो. हे अविश्वासूंसाठी नाही. हे मंडळीसाठी आहे. हे बाहेर बोलावले गेलेल्यांना पाचारण करण्यासाठी आहे, पवित्र झालेले आणि जे ख्रिस्त येशूमध्ये पाचारण झालेले असे आहेत.

37 आता, जर तुम्हाला माहिती करुन घ्यायचे असेल कसे आपण ख्रिस्त येशूमध्ये यावे, जर तुम्ही १ करिंथ १२ कडे वळाल, ते म्हणते, "कारण एका आत्म्याने आपला सर्वांचा एका शरीरात बाप्तिस्मा झाला आहे." कसे? कशाने बाप्तिस्मा झाला आहे? पवित्र आत्म्याने. पाण्याच्या बाप्तिस्म्याद्वारे नाही, तुम्ही चर्च ऑफ ख्राईस्ट लोकांनो, परंतु एका आत्म्याने[S-p-i-r-i-t], "एका आत्म्याद्वारे." एका हात मिळविण्याद्वारे नाही, एका पत्राद्वारे नाही, एका शिंपडण्याद्वारे नाही, परंतु एका आत्म्याद्वारे आपल्या सर्वांचा एका शरीरात बाप्तिस्मा झाला आहे. आपली मिळकत, भूमी जी देवाने राहण्यासाठी आपल्याला दिली आहे, तो पवित्र आत्मा आहे. जसा अगदी त्याने यहुद्यांना कनान दिला, तो आपल्याला पवित्र आत्मा देतो. एका आत्म्याद्वारे आपणा सर्वांचा एका शरीरात बाप्तिस्मा झाला आहे. तुम्हाला ते समजले?

38 आता तो आत्मिक कनान्यांना, इस्राएलांना, आत्मिक इस्राएल ज्यांनी भूमीवर ताबा मिळविला आहे, त्यांच्याशी बोलत आहे. ओह, तुम्ही आनंदित नाही तुम्ही मिसरातील लसणांतून बाहेर पडला आहात? तुम्ही आनंदित नाही तुम्ही अरण्याबाहेर आहात? आणि, लक्षात ठेवा, त्यांना मान्ना, स्वर्गातील दूतांचे अन्न खावे लागले, जोपर्यंत त्यांनी भूमी ओलांडली नाही. आणि जेव्हा त्यांनी भूमी ओलांडली, मान्ना पडण्याचा थांबला. ते तेव्हा मग पूर्णपणे परिपक्व होते, आणि त्यांनी भूमीतील जुने धान्य खाल्ले. आता, आता तुम्ही अजून बालक नाहीत, आता तुम्ही शुभवर्तमानाच्या निऱ्या दुधाची अपेक्षा करीत नाही, की तुम्हाला मंडळीत येण्यासाठी थोपटावे, आणि मनधरणी, आणि फाजील लाड करावे लागत नाही, आता तुम्ही वास्तविक पूर्ण प्रौढ ख्रिस्ती आहात, आता तुम्ही कठीण मांस खाण्यास तयार आहात. तुम्ही कशामध्येतरी येण्यास तयार आहात, तो म्हणाला. तुम्ही काहीतरी जे गहन आणि समृद्ध आहे ते समजण्यास तयार आहात. ओह, आपण यामध्ये थेट जाणार आहोत. आणि, ओह, ते जगाच्या पायारंभापासून गुप्त आहे. तो म्हणाला, "आता जेव्हा तुम्ही ह्यामध्ये आलेले आहात, मी तुम्हाला संबोधित आहे." त्यांना नाही ज्यांनी आताच मिसर सोडले आहे, त्यांना नाही जे अजून ही प्रवासात आहेत, परंतु त्यांना जे वचनदत्त भूमीत आहेत, ज्यांना अभिवचन प्राप्त झाले आहे.

39 किती जणांना पवित्र आत्म्याचे अभिवचन प्राप्त झाले आहे? ओह, तुम्ही आनंदित नाही का की आता तुम्ही येथे भूमीवर आहात, जुने धान्य खात आहात, देवाच्या कठीण गोष्टी खात आहात आणि तुम्हाला स्पष्ट समज मिळाली आहे. तुमचे आत्मिक मन पूर्णपणे गोंधळातून मुक्त झाले आहे. तुम्हाला तो कोण आहे हे उत्तम प्रकारे ठाऊक आहे, तुम्हाला तो काय आहे हे उत्तम प्रकारे ठाऊक आहे, तुम्हाला उत्तम प्रकारे ठाऊक आहे तुम्ही कोठे जात आहात. तुम्हाला त्याबद्दल सर्वकाही उत्तम प्रकारे ठाऊक आहे. तुम्हाला ठाऊक आहे तुम्ही कोणामध्ये विश्वास ठेवला आहे आणि तो तुम्ही जे काही त्याला सुपूर्द केले आहे ते त्या दिवसासाठी राखण्यास समर्थ आहे असा तुमचा भरवसा आहे. ओह, तो एक आहे, तोच जो आहे ज्याच्याशी पौल आता बोलत आहे. लक्षपूर्वक ऐका. आता पहा.

"...येशू ख्रिस्तामध्ये विश्वास ठेवणारे...."

40 आता, मंडळीला मला ते पुन्हा उच्चार करण्यास सांगू द्या. आपण ख्रिस्तामध्ये कसे येतो? मंडळीत सामील होऊन? नाही. आपले नाव पुस्तकात टाकून? नाही. बुडवून बाप्तिस्मा घेण्याद्वारे? नाही. आपण ख्रिस्तामध्ये कसे येतो? एका पवित्र आत्म्याने आपला सर्वांचा एका अभिवचनात - शरीरात बाप्तिस्मा झाला आहे - आणि जे काही भूमीच्या मालकीचे आहे त्याचे भागीदार झालो आहोत. आमेन! ओह, मला ते आवडते. जर माझा आवाज घोगरा नसता, मी आरोळी मारली असती. माझ्या, जेव्हा मी या भूमीत येतो, ती माझी आहे. मी आता घरी आहे, मी कनानात आहे. देवाला ज्यासाठी मला वापरावयाचे आहे अशा कोणत्याही गोष्टीसाठी मी बाध्य आहे. मी पवित्र भूमीवर चालत आहे, राजाचे मूल, पूर्णतः वस्त्र परिधान केलेले आणि तयार. मी मिसरातून बाहेर आलेलो आहे, वचनदत्त देशात आलेलो आहे, परीक्षांना सामोरे गेलो आहे, यार्देन ओलांडून आशीर्वादित अभिवचनात आलेलो आहे. ओह, कसे काय मला ते मिळाले? एका आत्म्याद्वारे. त्याच प्रकारे जसे पौलाला मिळाले. त्याच प्रकारे त्याने माझ्यावर कार्य केले जसे त्याच्यावर केले, त्याच प्रकारे त्याने तुमच्यावर केले. एका आत्म्याद्वारे आपला सर्वांचा बाप्तिस्मा झाला आहे. शिंपडण्याने नाही, फक्त थोडेसे शिंपडणे, खूप बरे वाटते; परंतु खाली बुडवा! सर्वांना.... पवित्र आत्म्याखाली पोहायला लावा. तेच तर अभिवचन आहे.

41 आपले इफिसकर, आपला यहोशवा, जो पवित्र आत्मा आहे.... यहोशवा म्हणजे "येशू, तारणारा." यहोशवा - म्हणजे पवित्र आत्मा, आत्मिकतेत दर्शवित आहे जसे ते नैसर्गिक होते, की तो आपला महान योद्धा आहे. तो आपला महान नेता आहे. जसा देव यहोशवाबरोबर होता, तसाच देव (पवित्र आत्म्यामध्ये) आपल्याला चालवीत आहे. आणि जेव्हा छावणीत पाप येते, पवित्र आत्मा थांबण्याची मागणी करतो. "या मंडळीमध्ये येथे काय चुकीचे आहे? काहीतरी चुकीचे आहे." ओह, तुम्ही पाहू शकत नाही कसे आपल्याकडे किशाचे कितीतरी पुत्र आहेत आता? कित्येक शौल विद्यालयातून आणि धर्मशास्त्राच्या शाळेतून बाहेर पडून, विकृत गोष्टी शिकवीत आहे, जसे पवित्र शास्त्र म्हणते ते करतील; वरवर पाहता विश्वास नाही, स्वतःला तुमच्यापासून विभक्त करतात, तुमच्याबरोबर संगती करीत नाही, आणि इत्यादी, सुभक्तीचे केवळ बाह्य स्वरुप दाखवून, तिचे सामर्थ्य नाकारतात. अशांपासून दूर रहा. त्यांना ठाऊक नाही ते कोठून आले आहेत. ते कोणतेही कारण देऊ शकत नाही.

42 मी हे भाऊ बूथ क्लिबोर्न, माझा मित्र यांच्याकडून सांगत आहे: जर तेथे काही अनौरस, देवाने निर्माण केले नाही, असे - काहीतरी जगामध्ये आहे - ते खेचर आहे. खेचर हे सर्व गोष्टींमध्ये खालच्या दर्जाचे आहे. त्याला ठाऊक नाही तो काय आहे. तो स्वतःला यापुढे उत्पन्न करु शकत नाही. खेचराचे दुसऱ्या खेचराबरोबर प्रजनन होऊन, खेचराला जन्म देऊ शकत नाही. तो समाप्त झालेला आहे. त्याला ठाऊक नाही त्याचा पिता कोठून आलेला आहे, त्याला त्याची माता ही ठाऊक नाही, कारण तो लहानसा गाढव आणि घोडी आहे. देवाने ते कधीही केले नाही. तुम्ही अशी काही गोष्ट देवावर टाकू नका. देवाने ते कधीही केले नाही. देव म्हणाला, "प्रत्येक जण आपापल्यापरी सबीज उपजवो." होय, महाशय. परंतु खेचर हा ... त्याचा पिता गाढव आहे आणि त्याची माता घोडी आहे, तेव्हा त्याला ठाऊक नाही तो कोणाच्या मालकीचा आहे. तो घोडा जो खेचर होण्याचा प्रयत्न करतो, किंवा खेचर ... किंवा, तो घोडा आहे जो गाढव बनण्याचा प्रयत्न करीत आहे, गाढव घोडा बनण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याला ठाऊक नाही तो कोणाच्या मालकीचा आहे. आणि तो जगातील सर्वात हेकेखोर असा आहे. तुम्ही त्याच्यावर कधीच कणाचाही भरवसा ठेवू शकत नाही.

43 आणि त्याच प्रकारे खूपसे लोक मंडळीत आहेत. त्यांना ठाऊक नाही त्यांचा पिता कोण आहे, त्यांना ठाऊक नाही त्यांची माता कोण आहे. केवळ त्यांना एक गोष्ट ठाऊक आहे, ते एक तर प्रेसबायटेरियन, मेथडिस्ट, बॅप्टिस्ट, किंवा पेन्टिकॉस्टल, किंवा काहीतरी आहेत. त्यांना ठाऊक नाही ते कोठून आले आहेत. आणि एक म्हातारा गाढव, तुम्ही तुम्हाला जेवढे हवे असेल तेवढे त्याच्यावर ओरडू शकता, आणि तो तेथे उभा राहील आणि ते दोन मोठे कान उभे टवकारील, आणि पाहिल. तुम्ही त्यांना रात्रभर प्रचार करु शकता, आणि त्यांना कणभर ही अधिक काही माहिती नसेल जेव्हा त्यांनी सोडले त्यापेक्षा जेव्हा ते आत आले. आता, ते अगदी खरे आहे. मला उद्धट असायचे नाही, परंतु मला तुम्हाला सत्य सांगायचे आहे.

44 परंतु तेथे एक गोष्ट आहे जी ते करु शकतात, ते चांगले कामकरी आहेत. ओह, ते फक्त काम, काम, काम, काम करतात. त्याने माझ्या मनामध्ये या आर्मेनियन जमावाबद्दल घातले जे नेहमी त्यांचा स्वर्गातील मार्ग कार्याद्वारे करण्याचा प्रयत्न करतात. ते बरोबर आहे, खेचर. ओह, लेडीज एड सोसायटी, आणि चिकन सपर प्रचारकाला पैसे देण्यासाठी, आणि "आपल्याकडे हे नृत्य, आणि हे सामाजिक असायला हवे," ते फक्त कार्य आहे, काम, काम, काम, काम, काम, काम, काम. आणि ते.... ते कशासाठी काम करतात?

त्यांना विचारा, "तुम्ही विश्वास केल्यानंतर तुम्हाला पवित्र आत्मा प्राप्त झाला का?"

ते त्यांचे कान टवकारतात, आणि ठाऊक नाही ते कोणाशी संबंधित आहेत. "तुमचा अर्थ काय? कुठे हे सर्व...? तुम्हाला काय म्हणायचे आहे, पवित्र आत्मा? मी त्याबद्दल कधीच काही ऐकले नाही. ओह, तू कोणतातरी प्रकारचा धर्मवेडा असला पाहिजे." पहा, त्यांना पिता कोण, किंवा एकतर माता कोण ठाऊक नाही. आणि तुम्ही जे काही करता त्या सर्वांसाठी तुम्हाला त्यांना मारावे लागते, येथे मारा आणि तेथे मारा, आणि येथे मारा आणि तेथे मारा. ते बरोबर आहे, म्हातारे खेचर.

45 परंतु, मी तुम्हाला सांगतो, तुम्हाला ते वास्तविक जातिवंत घोड्याबाबत करावे लागत नाही. फक्त एकदा त्याच्यावर चाबकाचा फटका मारा, आणि भावा, तो गेलेला असेल. त्याला ठाऊक आहे तो काय करीत आहे. ओह, कसे एका जातिवंतावर स्वारी करणे चांगले असते! किती छान! तुम्ही फक्त म्हणा, "मुला, ये." ओह, माणसा, पहा, बरे होईल तू घट्ट धर, तो खोगीर हवेत सोडील.

46 त्याच प्रकारे एका वास्तविक जातिवंत ख्रिस्तीजनाचे असते. हालेलूया! "तुम्ही पवित्र आत्मा प्राप्त करा! प्रत्येकाने पश्चाताप करा, आणि तुमच्या पापांच्या क्षमेसाठी येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घ्या." गेलेले असतील - अगदी जितक्या जलद गतीने जाता येईल जाऊ शकतात ते

पाण्याकडे गेलेले असतील. ते जोपर्यंत पवित्र आत्मा प्राप्त करीत नाही दिवसरात्र विश्राम करु शकत नाहीत. का? तुम्हाला ठाऊक आहे, एका ख्रिस्तीजनाला त्याचा पिता कोण आहे ते ठाऊक आहे. पहा, जन्म घेण्यासाठी दोघांची गरज आहे. ते बरोबर आहे, पिता आणि माता. खेचराला ठाऊक नाही कोणता पिता आणि कोणती माता. परंतु आपल्याला ठाऊक आहे पिता कोण होता आणि माता कोण होती, कारण आपण देवाच्या लिखित शब्दाने जन्म पावलेले होतो, जे आत्म्याने कायम केले होते. पेन्टिकॉस्टच्या दिवशी पेत्र म्हणाला, "जर तुम्ही पश्चाताप करुन, तुमच्या पापांच्या क्षमेसाठी येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घेतला, तर तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल."

47 आणि, भावा, एक वास्तविक नव्याने जन्मलेला ख्रिस्तीजन (ओह, माझ्या), तो आत्मिक असतो. जसे त्याला वचन मिळते, तो पवित्र आत्मा प्राप्त करतो, त्याला मग काहीतरी विचार! त्याला ठाऊक असते तो कुठे उभा आहे. "तू दैवी आरोग्यावर विश्वास करतोस?"

"आमेन!"

"तू दुसऱ्या आगमनावर विश्वास करतोस?"

"आमेन!"

ते खेचराला विचारा, खेचराचा धर्म. "हम्म, मला ठाऊक नाही. डॉ. जोन्स एका वेळेस म्हणाला...." आह, तेथे, शौलामागे जा, पहा. ओह, त्यांना ठाऊक नाही. "बरे, मी तुम्हाला सांगतो, माझी मंडळी त्याकरिता निश्चित नाही."

ओह, भावा, परंतु नव्याने जन्मलेला पुरुष आणि स्त्री ही अगदी प्रभू येशूच्या आगमनाबद्दल निश्चित आहे, ते अगदी पवित्र आत्मा मिळाल्याबद्दल इतके निश्चित आहेत जसा पवित्र आत्मा देण्यात येणार आहे.

48 आता, येशू म्हणाला.... विहिरीवरील स्त्री, "आम्ही या डोंगरावर उपासना करतो, आणि यहुदी यरुशलेमेत उपासना करतात."

तो म्हणाला, "बाई, माझे शब्द ऐक. अशी घडी येत आहे, आणि किंबहुना आलीच आहे, जेव्हा पिता अशांना शोधत आहे जे त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने करतील."

तुझा शब्द सत्य आहे. आणि प्रत्येक मनुष्य जो पवित्र शास्त्र वाचतो आणि पवित्र शास्त्र जे सांगते त्यातील प्रत्येक शब्दाचा विश्वास करतो, आणि त्याच्या सूचनांचे पालन करतो, आणि तोच पवित्र आत्मा प्राप्त करतो जो त्यांनी प्राप्त केला, त्याच प्रकारे जसा त्यांनी प्राप्त केला, तेच परिणाम जे त्यांनी प्राप्त केले, तेच सामर्थ्य त्यांना मिळाले जेव्हा त्यांनी तो प्राप्त केला, त्याला ठाऊक आहे त्याचा पिता आणि माता कोण आहे. त्याला ठाऊक आहे तो येशू ख्रिस्ताच्या रक्तामध्ये धुतला गेला आहे, आत्म्याने जन्म पावलेला, देवाच्या अभिषेकाने भरलेला. त्याला ठाऊक आहे तो कुठे उभा आहे. निश्चित! तो कनानात आहे. त्याला ठाऊक आहे तो कोठून आला आहे. आणि त्याच प्रकारे खऱ्या ख्रिस्तीजनाबरोबर असते. त्याला विचारा, "तू विश्वास केल्यानंतर तुला पवित्र आत्मा प्राप्त झाला का?"

"आमेन, भावा!"

49 त्या दिवशी, ब्याण्णव वर्षाच्या, वृद्ध संताबरोबर उभा होतो, तिच्या ऐंशी वर्षाच्या वृद्ध पाळकाबरोबर बोलत होतो. मी म्हणालो, "आजी?"

ती जेवढी असावयास हवी तेवढी तेजस्वी होती, ती म्हणाली, "होय, माझ्या मुला?"

मी म्हणालो, "तुम्हाला पवित्र आत्मा मिळून किती काळ लोटला?"

ती म्हणाली, "देवाचा गौरव असो, सुमारे साठ वर्षा अगोदर मला तो मिळाला."

आता, जर ती खेचर असती, ती म्हणाली असती, "आता, एक मिनिट थांब, मला शिंपडण्यात आले आणि कायम केले गेले जेव्हा मी.... बरे, विशिष्ट ... मग त्यांनी मला मंडळीत नेले आणि मी माझे पत्र अमुक आणि अमूकाकडे नेले." ओह, दया माझ्यावर! त्यांना अगदी ठाऊक ही नाही ते कोणाशी संबंधित आहेत.

परंतु तिला ठाऊक होते तिचा जन्मसिद्ध अधिकार कोठून आला होता. जेव्हा ते घडले ती तेथे होती. तिचा जन्म आत्म्याने आणि पाण्याने झाला होता. तिला ठाऊक होते. आणि पाणी.... "वचनाच्या जलस्नानाने" - ते वचन कार्य करते.

50 आता पहा कसे हे संबोधले गेले आहे: "त्यांना जे ख्रिस्त येशूमध्ये आहेत." पौल, आता लक्षात घ्या.... मी फार वेळ घेत आहे. (आता मी हा धडा संपवू शकणार नाही, परंतु मी त्वरा करीन.) तुम्हाला हे आवडते? ओह, हे आपल्याला आपण कुठे आहोत ते सांगते. परंतु आपण ते केवळ एका रात्रीत करु शकत नाही. आपल्याला एक किंवा दोन महिन्यातील, प्रत्येक रात्र हवी. फक्त यातून सरळ जाण्यासाठी, शब्द ते शब्द. मागे जाऊन, ते इतिहासातून आणणे, आणि ते शब्द ते शब्द सरळ ठेवणे, आणि तुम्हाला दाखविणे की हे सत्य आहे. आता ते पद मला परत पटकन वाचू द्या:

इफिस येथील पवित्र जन, व [उभयान्वयी अव्यय] ख्रिस्त येशूच्या ठायी विश्वास ठेवणारे, ह्यास देवाच्या इच्छेनुसार [मनुष्याच्या इच्छेने नाही] झालेला ख्रिस्त येशूचा प्रेषित, पौल ह्याच्याकडून....

51 याचा अर्थ त्यांना बाहेर पाचारण केले गेले होते, विभक्त झालेले, आणि आता पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा झालेले, आणि ख्रिस्त येशूमध्ये असलेले. "मी माझे प्रियजन, तुम्हाला हे पत्र उद्देशून लिहीत आहे." ओह! मला वाटते पौल अगदी आताच त्यांच्याबरोबर तेथे आहे. ओह, किती

आनंदित! त्या लहानशा वृद्ध प्रेषिताचे तेथे खाली शीर कापले गेले. मी त्या जागेजवळ उभा होतो जेथे त्यांनी त्याचे शीर छाटले. परंतु, ओह, त्याचे शीर त्या नवीन शरीरावर आहे, जे परत कधीही छाटले जाणार नाही. आणि तो तेथे त्यांच्याबरोबर प्रत्यक्ष या मिनिटाला उभा आहे, तोच प्रेषित ज्याने हे लिहिले, आणि म्हणाला, "तुम्ही जे ख्रिस्त येशूमध्ये आहात, एका आत्म्याने आपणा सर्वांचा या एका शरीरात बाप्तिस्मा झाला आहे." आता पहा.

देव आपला पिता, व ... प्रभू येशू ख्रिस्त याच्यापासून, तुम्हाला कृपा, व शांती असो.

आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित असो, त्याने स्वर्गातील सर्व अध्यात्मिक आशीर्वाद देऊन [ओह, तू ते ऐकतोस का, चार्ली?] आपल्याला ख्रिस्तामध्ये आशीर्वादित केले आहे....

52 फक्त काही प्रेषितांना नाही, आणि काही ह्यांना, परंतु त्याने आपल्या सर्वांना सर्व अध्यात्मिक आशिर्वादांनी आशीर्वादित केले आहे. तोच पवित्र आत्मा ज्याचा पेन्टिकॉस्टच्या दिवशी वर्षाव झाला तोच पवित्र आत्मा आज रात्री येथे आहे. तोच पवित्र आत्मा ज्याने मरीयेला आरोळी मारायला आणि अन्यभाषेत बोलावयास लावले, आणि अद्भुत समय होता आणि ती आनंदली आणि ज्या गोष्टी तिने केल्या, तोच पवित्र आत्मा आज रात्री येथे आहे. तोच पवित्र आत्मा ज्याने पौलाला त्या जुन्या तारवात ठेवले, जेथे असे दिसत होते की ते पाण्याने भरलेले होते आणि नाश झालेले.... चौदा दिवस आणि रात्र, चंद्र नाही आणि तारे नाही. त्याने तेथे बाहेर पाहिले आणि प्रत्येक लाटेवर सैतान होता, नाचत आणि त्याचे दात चमकवत, आणि म्हणाला, "म्हाताऱ्या मुला, मी तुला बुडवीन, आता. आता तू मला मिळालास."

53 आणि जेव्हा पौल छोटीशी प्रार्थना करण्यासाठी खाली गेला, तेथे दूत उभा होता, म्हणाला, "पौला, भिऊ नको. हे जुने तारु एका विशिष्ट बेटावर फुटणार आहे. पुढे जा आणि तुझे अन्न खा, आता ते सर्व ठीक आहे."

येथे तो ते साखळदंड त्याच्या लहानशा वृद्ध बाहूंवर घेऊन, त्यांना आपल्या पायात ओढीत आला, आणि म्हणाला, "धैर्य धरा, गृहस्थांनो, कारण ज्याचा मी दास आहे, त्या देवाचा दूत, माझ्या जवळ उभा राहून, म्हणाला, 'पौला, भिऊ नको.'" तोच पवित्र आत्मा आज रात्री येथे आहे, तोच देवाचा आत्मा, आपल्याला त्याच अध्यात्मिक आशिर्वादांनी साहाय्य करीत आहे.

...सर्व अध्यात्मिक आशिर्वादांनी आपल्याला स्वर्गीय स्थानात आशीर्वादित केले आहे....

54 ओह, येथे फक्त अजून एक मिनिट थांबूया. "स्वर्गीय स्थानात." आता, अगदी बाहेर कुठेतरी नाही, परंतु स्वर्गीय स्थानात. आपण स्वर्गीय स्थानात जमलेलो आहोत.... त्याचा अर्थ म्हणजे विश्वासूंचा दर्जा, की जर मी प्रार्थनामय असेन, तुम्ही प्रार्थनामय असाल, मंडळी प्रार्थनामय असेल, आणि आपण संदेशासाठी तयार असू; आणि संत म्हणून आपण स्वतःला एकत्र जमवलेले असेल, पाचारलेले, पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा झालेले, देवाच्या आशिर्वादांनी भरलेले, पाचारण झालेले, निवडलेले, आता स्वर्गीय स्थानात एकत्र बसलेले - आपल्या जीवांमध्ये आपण स्वर्गीय आहोत. आपल्या आत्म्याने आपल्याला स्वर्गीय वातावरणात आणले आहे. ओह, गौरव! तेथे तुम्ही आहात, स्वर्गीय वातावरण. ओह, आज रात्री काय घडू शकते! आज रात्री काय घडू शकते जर आपण येथे स्वर्गीय वातावरणात बसलेले असू, आणि प्रत्येक हृदयावर पवित्र आत्मा फिरत आहे जे पुनर्निर्मित झाले आहेत आणि ख्रिस्त येशूमध्ये नवी उत्पत्ती बनले आहेत, सर्व पापे रक्तखाली आहेत, परिपूर्ण उपासनेत, आपले हात वर देवाकडे उंचावलेले आणि आपली हृदये उन्नत झालेली, ख्रिस्त येशूमध्ये स्वर्गीय स्थानात बसलेले, स्वर्गीय स्थानात एकत्र उपासना करीत आहोत?

तुम्ही कधी अशा एकात बसलेले आहात? ओह, मी तोपर्यंत बसलेलो आहे जोपर्यंत मी आनंदाने रडत नाही आणि म्हणतो, "देवा, मला कधी येथे सोडू नको." अगदी ख्रिस्त येशूमध्ये स्वर्गीय स्थानात!

55 आपल्याला कशाने आशीर्वादित केले आहे? दैवी आरोग्य, पूर्वज्ञान, प्रकटीकरण, दृष्टांत, सामर्थ्य, अन्यभाषा, स्पष्टीकरण, शहाणपण, ज्ञान, सर्व आध्यात्मिक आशीर्वाद, आणि अनिर्वाच्य, गौरवयुक्त आनंद. प्रत्येक हृदय आत्म्याने भरलेले, एकत्र चालणारे, स्वर्गीय स्थानात एकत्र बसलेले; आपल्यामध्ये एकही वाईट विचार नाही, एकही सिगारेट फुंकलेली नाही, एकही तोकडा पोशाख नाही, एकही हे, ते, किंवा दुसरे नाही, एकही वाईट विचार नाही. कोणाचेही एकमेका विरुद्ध काही नाही, प्रत्येकजण प्रीतित आणि सुसंवादात बोलत आहेत, प्रत्येकजण एकमताने, एका स्थानात. "मग अचानक तेथे स्वर्गातून मोठ्या वाऱ्याच्या सुसाट्या सारखा आवाज आला." तेथे तुम्ही आहात, "आपल्याला सर्व आध्यात्मिक आशीर्वादाने आशीर्वादित केले आहे."

56 मग पवित्र आत्म्याचा कोणावरतरी वर्षाव होऊ शकतो, आणि म्हणेल, "परमेश्वर असे म्हणतो, 'एका विशिष्ट ठिकाणी जा आणि विशिष्ट गोष्ट कर.'" पहा ती अगदी त्याचप्रमाणे घडते. पहा? "परमेश्वर असे म्हणतो. एक विशिष्ट गोष्ट एका विशिष्ट ठिकाणी कर." पहा ती त्या प्रमाणे घडते.

आम्हाला सर्व स्वर्गीय आशीर्वादांनी स्वर्गीय स्थानात एकत्र आशीर्वादित केले आहे. पहा!

त्याच प्रमाणे त्याने आपल्याला निवडून....

आपण त्याला निवडले आहे, किंवा त्याने आपल्याला निवडले आहे? त्याने आपल्याला निवडले. केव्हा? त्या रात्री जेव्हा आपण त्याला स्वीकारले? निवडले....

त्याप्रमाणे आपण त्याच्या समक्षतेत पवित्र ... व निर्दोष असावे, म्हणून त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला [संप्रदायात?] प्रीतिमध्ये

ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले....

57 देवाने आपल्याला कधी निवडले? तुम्ही ज्यांना पवित्र आत्मा मिळाला आहे तुम्हाला देवाने कधी निवडले? तुम्हाला त्याने कधी निवडले? जगाच्या स्थापनेपूर्वी, त्याने तुम्हाला निवडले, आणि येशूला पाठविले की तो तुमच्या पापासाठी प्रायश्चित करील, तुम्हाला, स्वतःकडे, प्रेमाने, समेटासाठी पाचारण करील. ओह, इच्छा करतो आपल्याकडे अगदी काही थोड्या मिनिटाचा अवधी असता.

58 आपण अजून पुढे जाण्याअगोदर, मला, मागे जाऊ द्या, उत्पत्ती १:२६. (मी ते बुधवारी घेईन.) जेव्हा देवाने मनुष्य बनविला.... त्याने मनुष्याला बनविण्याअगोदर, त्याने स्वतःला "एल," ए-ला[E-l], एल; एलह[E-l-h], "एला[Elah]"; "एलोहीम[Elohim]" संबोधले. इब्रीमध्ये शब्दाचा अर्थ आहे "स्वयं अस्तित्व," स्वतः सर्वकाही. त्याच्या अगोदर काहीही अस्तित्वात नव्हते, तेथे कधी जे अस्तित्व होते ते सर्व तो होता, स्वयं अस्तित्व असा. एल, एला, एलोहीम, म्हणजे "सर्व पुरेसा, सर्वसामर्थी, परात्पर, स्वयं अस्तित्व असा." ओह!

59 परंतु उत्पत्ती २ मध्ये, जेव्हा त्याने मनुष्य घडीला, तो म्हणाला, "मी याहू[Y-a-h-u], जुवूह[J-u-v-u-h]; याव्हे[Yahua], यहोवा[Jehovah] आहे. त्याचा अर्थ काय? "मी सर्व स्वयं अस्तित्व असा ज्याने माझ्यामधून काहीतरी निर्मिले आहे माझा पुत्र होण्यासाठी, किंवा तात्पुरता, किंवा अपरिपक्व, माझा एक लहानगा." गौरव! का? त्याने मनुष्याला दिले ... यहोवा म्हणजे की त्याने मनुष्याला अपरिपक्व देव असे बनविले. कारण तो देवपिता आहे, आणि त्याने मनुष्याला अपरिपक्व देव असे बनविले, तेव्हा आता तो आणखीन अजून स्वयं अस्तित्व उरला नाही. तो त्याच्या कुटुंबाबरोबर अस्तित्वात आहे. एलाह, एलाह, एलोहिम. आता, आता तो यहोवा आहे, यहोवा म्हणजे "तो एक जो त्याच्या कुटुंबाबरोबर अस्तित्वात आहे." आता, देवाने मनुष्याला सर्व पृथ्वीवर प्रबळ वर्चस्व असणारा असे बनविले. त्याला अधिकार होता. आणि पृथ्वी ही माणसाच्या अधिकाराखाली होती. तो शास्त्रलेख आहे? मग जर तो त्याचा अधिकार होता, तो पृथ्वीवर देव होता. तो बोलू शकत होता आणि तसे होत असे. तो हे बोलत असे, आणि ते तसे होत असे. तेथे तो आहे: देव, यहोवा, जो एकदा स्वयं अस्तित्व असा होता, परंतु आता त्याच्या कुटुंबाबरोबर, आणि त्याची लहान मुले बाळे त्यांच्याबरोबर अस्तित्वात आहे. तेथे तुम्ही आहात.

60 आता, ते वाचा. बुधवार रात्री आपण त्यामध्ये जाऊ, जेव्हा आपल्याला जास्त वेळ मिळेल. आपण फक्त ... सुमारे पंधरा मिनिटे अधिक आणि आपण.... मी विचार केला मी येथे विशिष्ट मुद्यापर्यंत येईन, परंतु आपण येणार नाही, जेथे आपण अभिवचनाच्या पवित्र आत्म्याद्वारे मुद्रित केले गेले आहोत. ठीक आहे.

61 आता, आपण देवाचे दास म्हणून कधी पाचारले गेलो? ऑर्मन नेविलला देवाचा दास म्हणून कधी बोलाविले गेले? ओह, माझ्या! हे मला डगमगायला लावते. मी तुम्हाला सांगतो. काही शास्त्रलेख घेऊया. मला हवे आहे की तुम्ही १ पेत्र १:२० घ्यावे. आणि, पॅट, प्रकटीकरण १७:८ घे. आणि मी प्रकटीकरण १३ घेईन. आता येथे आपल्याला ऐकायचे आहे. तुम्हाला समजून घ्यायचे आहे की देवाने तुम्हाला ख्रिस्ती होण्यासाठी कधी पाचारण केले. ओह, मला हे आवडते. हे, "मनुष्य केवळ भाकरीने नव्हे, परंतु देवाच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक शब्दाने जगेल" आहे. ठीक आहे, भाऊ नेविल, तुला १ पेत्र १:२० मिळाले? बरे, १:१९ आणि १:२० वाच. हे ऐका. होय.

तर निष्कलंक व निर्दोष कोकरा असा, जो ख्रिस्त त्याच्या मूल्यवान रक्ताने तुम्ही मुक्त झाला आहात:

ज्याचे पूर्वज्ञान जगाच्या स्थापनेच्या आधी झाले होते, तोच काळाच्या शेवटी तुम्हासाठी प्रकट झाला.

62 केव्हा तो नियुक्त झाला होता? जगाच्या स्थापनेअगोदर. भाऊ पॅट, माझ्यासाठी प्रकटीकरण १७:८ वाच.

जे श्वापद तू पाहिले ते होते, आणि नाही; ते अथांग डोहातून वर येणार आहे, व नाशाप्रत जाणार आहे: जगाच्या स्थापनेपासून ज्यांचे नाव जीवनाच्या पुस्तकात लिहिले नाही, अशा पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांना, ते श्वापद होते आणि नाही, तरी हजर आहे, असे पाहून आश्चर्य वाटेल.

कोण फसविले जाणार आहेत? या धार्मिक व्यक्तीद्वारे जसा शौल होता कोण फसविले जाणार आहेत? तो अगदी इतका धूर्त आणि इतका परिपूर्ण असेल की शेवटी कोणाला फसविल? अगदी... [श्रोते उत्तर देताना, "निवडिलेल्यास"] जर ... ["शक्य असेल"] जर शक्य असेल. ठीक आहे, प्रकटीकरण १३:८, मला ते तुमच्यासाठी वाचू द्या.

आणि ते सर्व ज्या कोणाची नावे जगाच्या स्थापनेपासून वधलेल्या कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात लिहिलेली नाहीत, असे पृथ्वीवर राहणारे त्या श्वापदाला नमन करतील.

63 आपली नावे कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात कधी टाकली गेली? जेव्हा कोकरा जगाच्या स्थापनेपूर्वी वधला गेला, जेव्हा देव यहोवा होता, एल, एलाह, एलोहीम, स्वयं अस्तित्व असा होता. अगदी जसा एक मोठा महान हिरा, आणि तो अजून काही असू शकत नव्हता. परंतु या हिऱ्यामध्ये, त्याचे गुण होते, तो तारक होता; त्याच्या गुणात, त्याच्या आतमध्ये, तो आरोग्यदाता होता. बरे, तेथे बरे करण्यासाठी काही नव्हते आणि तारण्यासाठी काही नव्हते, परंतु त्याच्या गुणांनी ते उत्पन्न केले. मग, जेव्हा, जगाच्या स्थापनेपूर्वी, जेव्हा त्याला ठाऊक होते की तो एक तारक म्हणून येथे त्याचे महान प्रदर्शन असणार आहे, की तो येईल आणि देह बनेल आणि आमच्यामध्ये वास करील, आणि त्याला ठाऊक होते त्याच्या फटक्याद्वारे आपण बरे होऊ, त्याच्या पुस्तकात जगाच्या स्थापनेपूर्वी त्याने कोकरा वधला, आणि जगाच्या स्थापनेपूर्वी तुमचे नाव त्या पुस्तकात लिहिले.

64 हे ऐका! पूर्वनिर्धारितपणा मागे पूर्वज्ञानाकडे पाहतो - मला म्हणायचे आहे निवड. निवड पूर्वज्ञानाकडे पाहते, आणि पूर्व निर्धारितपणा प्रारब्धाकडे पाहतो. हे विसरु नका, की निवड येथे मागे पाहते. येथे ते आहे: मी धोतरा होतो. माझा जन्म पापात झाला, दुष्कर्मामध्ये घडला गेलो, खोटे बोलत जगात आलो, पाप्यांमध्ये जन्मलो. माता आणि पिता आणि माझे सर्व कुटुंब, पापी होते. मी धोतरा होतो. परंतु, अचानक, मी

गव्हाचा दाणा झालो. ते कसे घडले? ते, ते काय आहे? निवड. देवाने, जगाच्या स्थापनेपूर्वी, निवडले होते की धोतरा हा गव्हाचा दाणा व्हावा. आता मला ठाऊक आहे मी गव्हाचा दाणा आहे, कारण मी तारला गेलो आहे. मी ते कसे करतो? मागे पाहतो आणि बघतो की त्याने, फार पूर्वी, ते पूर्वनिर्धारित केले आहे. पूर्वज्ञानाद्वारे त्याने पाहिले की मी त्याला प्रेम करीन, तेव्हा त्याने त्याच्या स्वतःच्या पुत्राद्वारे प्रायश्चित्त केले, की त्याच्याद्वारे मी धोतऱ्यापासून गव्हाचा दाणा व्हावे. आता, मी कुठे आहे आता? मी वाचलेलो आहे, मी देवाच्या कृपेमध्ये चालत आहे. पूर्वनिर्धारितपणा कुठे पाहतो? प्रारब्धाकडे - जेथे तो मला घेऊन जाईल, आणि मी कोठे जात आहे? त्याने तुम्हाला घेतले. तेथे तुम्ही आहात.

65 आता अगदी थोडेसे पुढे वाचूया, आणि मग आपल्याला अगदी लवकरच समाप्त करावे लागेल.

त्या प्रमाणे ... आपण त्याच्या समक्षतेत पवित्र ... व निर्दोष असावे म्हणून, त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले:

त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे, आपल्याला येशू ख्रिस्ताच्या द्वारे स्वतःचे दत्तक होण्याकरिता प्रेमाने पूर्वीच नेमले होते.

त्याने काय केले? त्याने, पूर्वज्ञानाद्वारे, आपल्याला अगोदरच पाहिले, ज्ञात होते की तो तारक होता. स्वयं अस्तित्व - तेथे दूत नव्हते, काहीही नव्हते; फक्त देव, एलाह, एलोहीम, स्वयं अस्तित्व असा, काही नाही परंतु तो एकटा. परंतु त्याच्यामध्ये तारक होता. बरे, तो काय तारावयास जाणार आहे? तेथे काहीही गमावलेले नव्हते. माहित होते, की त्याला माहित होते की त्याच्यातील हा महान गुण तेथे बाहेर पलीकडे काहीतरी प्रक्षेपित करील जे तो वाचवू शकेल. मग जेव्हा त्याने ते केले, पूर्वज्ञानाने त्याने खाली पाहिले आणि त्याने प्रत्येकाला पाहिले जे त्याला स्वीकारतील. आणि मग तसे करण्याद्वारे, तो म्हणाला, "त्याला तारण्यासाठी, केवळ एका मार्गाने मी ते करु शकतो, स्वतः मी खाली येईन आणि देह धारण करीन मनुष्याची पापे त्याच्यावर घेईन, आणि त्याच्यासाठी मरेन, की मी तो एक असेन ज्याची उपासना केली जाईल," कारण तो देव आहे, उपासना करण्याची वस्तू.

66 मग तो खाली आला आणि स्वतःवर घेतले. आणि त्याने ते का केले, त्याने ते केले की त्याने तुम्हाला वाचवावे ज्यांना वाचावयाचे आहे. तुम्ही पाहता मला काय म्हणावयाचे आहे? पूर्वज्ञानाद्वारे, अमर्याद देव, ज्याला सर्व गोष्ट माहिती होत्या, कोकऱ्याला पाहिले, आणि जगाच्या स्थापने अगोदर त्याने कोकऱ्याला वधिले, आणि कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात त्याने तुमचे नाव घातले. आणि त्याने सैतानाचा कपटीपणा पाहिला, की तो काय करील. म्हणून त्याने तुमचे नाव तेथे ठेवले. आणि तो म्हणाला की ख्रिस्तविरोधी इतका धार्मिक, इतका चांगला, इतका आकर्षक मनुष्य, इतका चाणाक्ष मनुष्य, इतका धार्मिक मनुष्य असेल, की जर शक्य असेल तर तो अगदी निवडलेल्यास देखील फसविल. परंतु ते शक्य नाही, कारण त्यांची नावे जगाच्या स्थापनेपूर्वीच नियुक्त झाली आहेत. निवडीद्वारे त्याने त्यांना पसंत केले, आणि पूर्वनिर्धारितपणाद्वारे त्यांना ठाऊक आहे ते कोठे जात आहेत.

67 आता कोण त्याची शंका घेऊ शकतो? तेच काय ते पौल म्हणाला. तो पौलाचा शास्त्रलेख आहे. ते पौलाचे लेखन आहे. तेच काय ते त्याने त्याच्या मंडळीला शिकविले - जगाच्या स्थापनेपूर्वी जी मंडळी स्थानापन्न झाली होती. जेव्हा देव त्याच्या प्रसूती वेदनेत जन्म देत होता, तुम्हाला जन्म देत होता, माहिती होते की तुम्ही काय कराल, त्याने त्याच्या स्वतःच्या देहात तुम्हाला योग्य जागेवर ठेवले, एक गृहिणी म्हणून, शेतकरी होण्यासाठी, प्रचारक होण्यासाठी, संदेष्टा होण्यासाठी, हे किंवा ते होण्यासाठी. त्याने तुम्हाला योग्य जागेवर ठेवले. मग जेव्हा आपण मिसरातील लसणाच्या भूमीतून आलो, पवित्रीकरणातून आणि वचनदत्त देशात बाप्तिस्मा पावलो.... कारण पवित्र आत्मा देवाचे अभिवचन आहे. इफिस ४:३० म्हणते, "पवित्र आत्म्याला खिन्न करु नका ज्याद्वारे तुम्ही मुक्तीच्या दिवसापर्यंत त्यामध्ये मुद्रित झाला आहात." तेव्हा देवाने, मंडळीला पूर्वनिर्धारित करुन, तो म्हणाला.... आणि सर्व लोक, तेथे दशलक्षच्या दशलक्षपट असतील जे फार धार्मिकतेने चालतील आणि फसविले जातील. केवळ फक्त ते जे फसविले जाणार नाहीत जे वचनदत्त देशात आलेले आहेत, ज्यांची नावे जगाच्या स्थापनेपूर्वी कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात लिहिलेली आहेत, आणि वचनदत्त देशात आलेले आहेत, आणि त्याचा आनंद घेत आहेत.

68 कित्येक लोक घाबरतात की तुम्ही चमत्कारिक वर्तन करणार आहात. कित्येक लोक घाबरतात की पवित्र आत्मा तुम्हाला असे काहीतरी करावयास लावील की तुम्हाला ... लोकांची लाज वाटेल. कित्येक लोकांना भीती वाटते की ते रडतील, आणि त्यांची प्रेमिका त्यांना रडताना पाहिल, किंवा आई, किंवा तुमचा शेजारी, किंवा तुमचा मालक तुम्हाला पाहिल.

(समाप्त करण्यापूर्वी) मला तुम्हाला सांगू द्या एका माणसाबद्दल. तेथे दावीद नावाचा एक मनुष्य होता. आणि जेव्हा देवाच्या कराराचा कोश पेलेस्टाईनमध्ये होता, आणि तो पलीकडे आला, बैलगाडीद्वारे ओढला गेला - म्हातारे बैल त्याला ओढीत होते, जेव्हा दाविदाने कोशाला येताना पाहिले (त्याने छोटासा झगा परिधान केलेला होता), तो बाहेर धावला. त्याने त्याचे पाय हवेत भिरकावले, आणि सभोवती उडी मारली, आणि आरोळी मारली आणि उड्या मारल्या, आणि नाचला आणि उड्या मारल्या आणि नाचला. आणि, तो, इस्राएलाचा राजा होता! आणि त्याच्या पत्नीने खिडकीतून बाहेर पाहिले आणि त्याला इतके विचित्र वर्तन करताना बघितले, तिला त्याचा तिरस्कार वाटला. का, ती म्हणालीच असेल, "मूर्ख! त्याच्याकडे तेथे बाहेर पहा, ज्याप्रकारे तो वर्तन करीत आहे, पाय हवेत भिरकावीत आहे, आणि सभोवती उड्या मारीत आहे आणि अशा प्रकारे वर्तन करीत आहे. का, तो वेडा असला पाहिजे!" आणि त्या रात्री जेव्हा तो आत आला, ती म्हणाली, अशा शब्दात, "का, तुम्ही मला लज्जास्पद केले. का, तू, राजा, माझा पती, तेथे बाहेर अशा प्रकारे करीत होतास, अशा प्रकारे वर्तन करीत होतास!"

दावीद म्हणाला, "उद्या मी त्यापेक्षा चांगले करीन. होय, महाशय!" तो म्हणाला, "तुला ठाऊक नाही मी प्रभूसाठी नाचत होतो?" तो पार झाला होता. तो वचनदत्त देशामध्ये होता. त्याने सर्व स्वतःची शैली आणि जगाची घाण गमावली होती. कोष त्याच्या स्वतःच्या शहरात येत आहे हे कळल्याने तो अतिशय आनंदित झाला होता.

69 ओह, मी तुम्हाला सांगतो, काही लोक पवित्र आत्मा प्राप्त करण्यास भितात, घाबरतात की ते कदाचित अन्यभाषेत बोलतील. ते भितात की कोणीतरी म्हणेल, "आता, तो अन्यभाषा बोलणाऱ्यांपैकी एक आहे." ते येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घेण्यासाठी मंडळीत येण्यास भितात, कारण त्यांना त्याची लाज वाटते. ओह!

कोणीतरी म्हणाले मला माझ्या ध्वनिमुद्रणपट्ट्या मागे घ्याव्या लागतील, कारण मी येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घेणे यावर प्रचार केला आहे. मी त्या मागे घेत नाही. मी त्या अधिक बनवितो! ते खरे आहे, अधिक बनवितो! ते पवित्र शास्त्र आहे. जर आम्ही जे काही काल केले ते त्यांना आवडले नाही, फक्त पहा उद्या आम्ही काय करणार आहोत! तीच गोष्ट आहे जी करणे आहे, पहा, फक्त पुढे जात रहा. याला अंत नाही, कारण हे परमेश्वराचे आहे. हा देव आहे.

70 तुम्हाला ठाऊक आहे देवाने काय केले? देवाने स्वर्गातून खाली पाहिले. तो म्हणाला, "दाविदा, तू माझ्या मनासारखा मनुष्य आहेस." दावीद लाजला नाही. तो परमेश्वराचा दास होता. तो परमेश्वराला प्रेम करीत असे. आणि तो इतका खुश होता, इतका अत्यानंदित होता, की त्याने त्याच्या मानवी लौकिकाचा ही विचार केला नाही.

तुम्ही पहा, जसे मी या सकाळच्या उपदेशात म्हणालो, आपण इतके भितो की.... आपल्याला शिकविण्यासाठी शौल हवा, आपल्याला कोणत्या विद्यालयातून शौल हवा आपल्याला सांगण्यासाठी की आपला धर्म आपण कसा करायला हवा आणि कसा तो आपण करायलाच हवा. ते यार्देनेच्या दुसऱ्या बाजूला आहे. या बाजूला, पवित्र आत्मा चालवितो. या बाजूला तुम्ही त्या घाणीतून बाहेर आहात. या बाजूला तुम्ही चिंता करीत नाही ते काय विचार करतात. या बाजूला तुम्ही मृत आहात, आणि तुमचे जीवन ख्रिस्ताद्वारे गुप्त आहे ... आणि पवित्र आत्म्याने मुद्रित आहे. तुम्ही पर्वा करीत नाही. तुम्ही कनानात राहत आहात. तुम्ही चांगला दाणा म्हणून उभे राहू शकता. तुम्ही ख्रिस्त येशूमध्ये नवी उत्पत्ती आहात. तुम्ही वचनदत्त भूमीसाठी बद्ध आहात.

71 भाऊ कॉलिन्स, काही तीस वर्षा अगोदर, मी पलीकडे उभा राहिलेला स्मरतो, जेव्हा हे प्रार्थनामंदिर अजूनही उभारले गेले नव्हते. तो लहानसा तंबू येथे कोपऱ्यावर सभेसाठी टाकलेला होता, माझी पहिली सभा. मी हेच शुभवर्तमान प्रचार करीत होतो, हीच गोष्ट: ख्रिस्ताची अगाध समृद्धी, येशू ख्रिस्ताच्या नावात पाण्याचा बाप्तिस्मा, प्रत्येक वचन सत्य आहे असा विश्वास करणे, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा, दैवी आरोग्य, देवाचे सामर्थ्य, अगदी जसे मी आता प्रचार करतो, यातील एकापासून एक इंच देखील बदललेलो नाही. देवाने त्याच्यातील अधिक मला प्रकट केले आहे, तेव्हा, जसा तो मला ते प्रकट करितो, मी अगदी ते पुढे आणीत जातो. तो जे काही होते ते कधीही काढून घेत नाही; तो केवळ त्यामध्ये अधिक भर घालीत जातो.

72 मी तेथे उभा होतो जेव्हा सुमारे पाचशे लोक किनाऱ्यावर उभे राहून, गात होते, "यार्देनेच्या वादळी किनाऱ्यावर मी उभा आहे, आणि कनानाच्या सुंदर व आनंदी भूमीकडे, अभिलाषी नेत्र लाविला आहे, जेथे माझी मालकी आहे. केव्हा मी त्या आरोग्यदायी किनाऱ्यावर पोहोचेन आणि निरंतरचा आशीर्वादित होईन? केव्हा मी पोहोचेन माझ्या पित्याच्या ... आणि निरंतरचा विसावा घेईन?" जेव्हा त्यांनी ते गाण्याची सुरुवात केली, मी मुलाला प्रभू येशूच्या नावात बाप्तिस्म्यासाठी नदीत नेत होतो. मी म्हणालो, "स्वर्गीय पित्या, त्याच्या कबुली प्रमाणे मी या मुलाला तुझ्याकडे आणतो...." मी स्वतःदेखील, अगदी मुलगाच होतो. घरी त्याचा फोटो देखील आहे. मी म्हणालो, "जेव्हा परमेश्वरा, मी त्याला पाण्याने बाप्तिस्मा देईन, त्याच्या कबुलीप्रमाणे, येशू ख्रिस्त देवाचा पुत्र या नावाने, तू त्याला पवित्र आत्म्याने भर." आणि जवळजवळ त्या वेळेस कशानेतरी वावटळ सोडली, आणि तो येथे वावटळीत आला. तेजस्वी आणि पहाटेचा तारा तेथे उभा होता. तेथे तो प्रकाश उभा होता जो तुम्ही अगदी तेथे त्या छायाचित्रात पाहता. तो तेथे उभा होता.

73 ते जगभर पसरले, कॅनडा आणि सभोवती. ते म्हणाले, "स्थानिक बॅप्टिस्ट सेवकावर तो बाप्तिस्मा करीत असताना गूढ प्रकाश आला."

काही दिवसा अगोदर, जेव्हा डॉ. लमसा माझ्याकडे आले, आणि त्याबद्दल कधीच काहीच ठाऊक नव्हते, आणि माझ्याकडे एक छायाचित्र आणले, जे भावाकडे आता आहे. तुझ्याकडे छायाचित्र आहे का? तुझ्याकडे पवित्र शास्त्र आहे का, तेथे ते आहे, ते तुझ्या पुस्तकात आहे का? ठीक आहे. तेथे जुन्या प्राचीन इब्री देवाचे चिन्हाचे चित्र होते, अगदी तंतोतंत जसे ते ईयोबाच्या दिवसात अस्तित्वात होते, पवित्रशास्त्र कधी लिहिण्या अगोदर. देव त्याच्या तीन गुणात; तीन देव नाहीत. एक देव तीन गुणात - पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा, तीन कार्यालये ज्यामध्ये देवाने कार्य केले. तीन देव नाहीत; तीन गुण. आणि ते तेथे होते.

74 जेव्हा तो महान मनुष्य, डॉ. लमसा, लमसा पवित्रशास्त्राचा भाषांतर करणारा, जेव्हा तो त्या सकाळी म्हणाला ... जेव्हा मी त्याला ते सांगितले, मी म्हणालो, "ते चिन्ह काय आहे?"

तो म्हणाला, "ते देवाचे इब्रीमध्ये प्राचीन चिन्ह आहे. देव, एक देव तीन गुणांमध्ये."

मी म्हणालो, "जसे पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा?"

तो थांबला, आणि त्याने त्याचा कॉफीचा कप खाली ठेवला. त्याने माझ्याकडे पाहिले. (जेन, विश्वास करतो तू तेथे होतास, लिओ.) म्हणाला, "तू ते विश्वास करतोस?"

मी म्हणालो, "माझ्या संपूर्ण हृदयाने."

तो म्हणाला, "गेल्या रात्री तुमच्या सभेमध्ये उभा होतो, भाऊ ब्रॅन्हम, मी ते पारख करणे पाहिले. अमेरिकेमध्ये मी कधी ते अगोदर पाहिले नव्हते, माझ्या भूमीमध्ये. तो म्हणाला, "या अमेरिकन लोकांना अगदी पवित्रशास्त्र ही ठाऊक नाही. त्यांना केवळ त्यांचा संप्रदाय ठाऊक आहे.

त्यांना अगदी हे ही ठाऊक नाही की ते कुठे उभे आहेत." म्हणाला, "त्यांना काही एक ठाऊक नाही." तो म्हणाला, "परंतु जेव्हा मी गेल्या रात्री तेथे उभा होतो, मी म्हणालो.... [आता, भाऊ जेन, मी हे आदराने आणि प्रेमाने आणि असे सांगतो.]" तो म्हणाला, "मी म्हणालो, 'तो संदेष्टा असायला हवा.' परंतु जेव्हा मी पाहिले की तुम्ही पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा तीन देव नाहीत असा विश्वास करता, ते गुण आहेत, मग मला समजले की तुम्ही देवाचे संदेष्टे आहात, अन्यथा हे अशा प्रकारे तुम्हाला प्रकट झाले नसते." तो म्हणाला, "ते सिद्ध चिन्ह आहे." म्हणाला, "मी कधीही...." म्हणाला, "तुम्ही एकत्ववादी नाही?"

75 मी म्हणालो, "नाही, महाशय. मी एकत्ववादी नाही. मी विश्वास करतो की देव परात्पर देव आहे, आणि तीन गुण ही केवळ तीन कार्यालये आहेत ज्यामध्ये एका देवाने वास केला."

तो म्हणाला, "तुझे हृदय आशीर्वादित असो!" तो म्हणाला, "कधीतरी त्या खातर तू तुझे रक्त पृथ्वीवर सांडशील, परंतु," म्हणाला, "संदेष्टे नेहमी त्यांच्या कारणास्तव मरतात."

आणि मी म्हणालो, "तसेच होवो, जर ते माझ्या परमेश्वराला संतोषविते." लमसा पवित्रशास्त्राचा अनुवाद.

76 ओह, ते इतके सत्य आहे. कित्येक वेळेस मी या मंडळीला सांगितले आहे, जसे शमुवेल म्हणाला त्यांनी शौलाला निवडण्या अगोदर.... तुम्ही बाहेर जाऊन, कोणत्या संप्रदायामध्ये आता सामील होण्याअगोदर, आणि कोणत्यातरी प्रकारच्या धर्मामध्ये पूर्णपणे जखडण्या अगोदर, का नाही तुम्ही पवित्र आत्म्याला तुमचे नेतृत्व करु देत? का नाही तुम्ही देवाला तुमचा नेता म्हणून घेत नाही आणि त्याला तुम्हाला आशीर्वादित करु द्या, आणि तुमच्या संप्रदायाबद्दल विसरुन जा. आता, मी नाही सांगत तुम्ही कोणत्या सांप्रदायिक मंडळीशी संबंध ठेवू नका. तुम्ही कोणाशीही जी तुम्हाला हवी असेल त्याच्याशी संबंध ठेवू शकता. ते तुमच्यावर आहे. परंतु मी तुम्हाला, एक व्यक्ती म्हणून सांगत आहे, तुम्ही पवित्र आत्म्याला तुमचे नेतृत्व करु द्या. तुम्ही पवित्रशास्त्र वाचा. आणि जे काही पवित्र शास्त्र करावयास सांगते, ते तुम्ही करा. देव तुम्हाला आशीर्वादित करो.

77 आणि आता मी खूप वेळ वाट पाहिली आहे. मी विचार करतो जर येथे कोणी असेल ज्याला प्रार्थना रांगेतून प्रार्थना करुन घेण्यासाठी यायचे होते. जर तेथे आहेत, ते त्यांचे हात वर करतील का. फक्त एक, दोन, तीन. ठीक आहे. तुम्ही सर्व सरळ येथे या आणि येथे उभे रहा मग जर तुमची इच्छा असेल, या वेळेस, आणि आपण प्रार्थना करु. आणि मग आम्ही.... मला तुम्ही अजून ही निघावे असे वाटत नाही. मला आपण अगदी समाप्त करण्या अगोदर काहीतरी येथे अधिकृतरीत्या करायचे आहे.

78 किती जणांना गलतीकराच्या पुस्तकाचा अभ्यास आवडतो? ओह, मला म्हणायचे आहे इफिसकराच्या. आता, बुधवार रात्री आपण शिक्क्यामध्ये जाणार आहोत. आणि मग पुढच्या रविवार सकाळी, आपण मंडळीला योग्य ठिकाणी स्थानापन्न करणार आहोत. ओह, आपण कदाचित त्यामध्ये या येणाऱ्या बुधवारी रात्री असू, तुम्ही "जेफ"मध्ये राहणाऱ्या लोकांकरिता. मंडळीला योग्य स्थानी स्थानापन्न करणे जेथे ती मालकीची आहे, प्रत्येक जण - कसे आपल्याला दत्तकपणाद्वारे पाचारण केले आहे. देवाने आपल्याला पुत्र म्हणून दत्तक घेतले आहे. आपण जन्माद्वारे पुत्र आहोत, पवित्र आत्म्याद्वारे दत्तक घेतलेले आणि योग्य स्थानी स्थानापन्न केलेले आहोत. पहा! ते सर्व प्रत्येक जण इब्री होते जेव्हा त्यांनी नदी ओलांडली, परंतु यहोशवाने भूमी विभागून दिली आणि प्रत्येकाला त्याची भूमी दिली त्याच्या आईच्या उच्चाराप्रमाणे प्रसूतीच्या समयी, जेथे पवित्र आत्म्याने तिला सांगितले होते.

79 याकोबाकडे पहा जेव्हा तो मरत होता, एक संदेष्टा, अंध. त्याने त्याचे पाय पलंगावर घेतले, म्हणाला, "याकोबाच्या पुत्रांनो, तुम्ही पुढे या, आणि मी तुम्हाला सांगेन शेवटच्या दिवसात तुम्ही कुठे असाल." गौरव! ओह, मला ठाऊक आहे मी कदाचित विचित्र भासेल, लोकांना कदाचित विचित्र भासेल, परंतु, ओह, जर केवळ तुम्हाला आश्वासन ठाऊक असेल, हृदयामध्ये तेवत आहे. "पुढे या आणि आणि मी तुम्हाला सांगेन शेवटच्या दिवसात तुम्ही कुठे असाल." आणि मी तोच शास्त्रलेख घेतो, आणि आज यहुदी कुठे बसलेले आहेत त्याचा नकाशा घेतो, आणि तुम्हाला सिद्ध करतो ते तंतोतंत त्याच ठिकाणी आहेत जे याकोबाने सांगितले होते की ते शेवटच्या दिवशी असतील. आणि ते कधीच नव्हते ... त्या स्थानावर नव्हते जोपर्यंत ते परत आले नाही ... मे ७, १९४६ पासून, त्या रात्री परमेश्वराचा दूत माझ्याकडे आला तेथे वर आणि मला या कार्याबद्दल सांगितले. आणि मी तुम्हाला दाखवू शकतो की जेव्हा ते परत आले नवीन भूमीत, ते अगदी त्याच जागेवर आले जेथे याकोबाने सांगितले होते की ते बसतील. आणि तेथे ते आज बसलेले आहेत. ओह, माझ्या, ओह माझ्या! आपण एक दिवस अजून घराच्या जवळ आहोत, हेच काय ते सर्व.

80 तुम्ही प्रिय लोकहो, तुम्ही आजारी आहात, नाहीतर तुम्ही तेथे उभे नसता, फक्त उभे राहण्यासाठी. मी तुमचा भाऊ आहे. मला आजाऱ्यांसाठी प्रार्थना करण्यासाठी देवाकडून मिळालेली कामगिरी आहे. माझे म्हणून नाही... जसे काही मला आरोग्य देण्याचे सामर्थ्य आहे. मला नाही. परंतु माझ्याकडे प्रार्थनेचे सामर्थ्य आहे. जसे मी या सकाळी म्हणालो, दाविदाकडे लहानशी गोफण सोडून काही एक नव्हते, परंतु तो म्हणाला, "मला ठाऊक आहे यावर देवाचे सामर्थ्य आल्यावर ती काय करील," पहा. माझ्याकडे केवळ लहानशी प्रार्थना आहे तुमच्यासाठी अर्पण करण्यास, आणि माझे हात तुमच्यावर ठेवण्यासाठी, परंतु मला ठाऊक आहे देवामधील विश्वास काय करील. त्याने इतरांसाठी केले आहे, तो तुमच्यासाठी ही करील. आता जसे तुम्ही बाहेर निघता, अगदी थोडेसे स्थानाच्या नजीक, तेव्हा तुम्ही त्यावर विश्वास करा.

81 आता, मी विचार करतो, त्याला इतके परिणामकारक बनवायचे नसते, तर मी माझ्या भावाला येथे येऊन, त्यांना तेलाने अभिषेक करण्यास सांगितले नसते. भाऊ नेविल, तुम्ही ते कराल? मी मंडळीला विचारीन जर तुम्ही प्रार्थनेमध्ये नतमस्तक व्हाल.

आता लक्षात ठेवा, गेल्या आठवड्यात, त्या जुन्या एरंडेल तेलामुळे, मी इतका आजारी होतो, मी अगदी काहीही दिले असते जर

माझ्याकडे कोणीतरी येऊन, माझ्यावर हात ठेवले असते. जर माझ्याकडे कोणीतरी असते येण्यासाठी ज्याला देवाने आशीर्वादित केले आहे आणि साहाय्य केले आहे, मी त्याचे फार कौतुक केले असते. तुम्हा सर्वांना आता तसेच वाटते जसे मला तेव्हा वाटले. आता तुम्हाला मी तसे करावे असे वाटते जसे मला कोणीतरी माझ्यासाठी करावे असे वाटत होते. देव न करो मी कधी माझे काम टाळेन. महत्प्रयासाने मला नेहमी, जरी मी थकलेला, जरी मी भागलेला असेन, जरी मी एक पाय दुसऱ्यापासून हलवू शकत नसेन, मला जाऊ दे, कारण मी तुम्हातील प्रत्येकाला, तेथील त्या पलीकडच्या भूमीत, परत भेटणार आहे.

82 मग तुम्ही वृद्ध स्त्रिया आणि वृद्ध पुरुष, भंगलेले, पिकल्या केसांचे आणि गळणाऱ्या केसांचे, आणि गुलाबाप्रमाणे भागामध्ये पडणारे जे आपली लहानशी कळी उघडते, त्याच्या पाकळ्या गाळते, पडून जातात, तुम्ही अगदी तुकडे तुकडे होता, नाही का? ते बरोबर आहे. आणि केवळ एकाच गोष्टीसाठी तुम्हाला एकत्र राहायचे असते ते म्हणजे देवाच्या गौरवासाठी तळपायचे असते. तेव्हा जेव्हा शत्रूने तुम्हाला आता पकडले आहे आणि धावचीत झालेले आहात, मी देवाची गोफण घेऊन येत आहे, विश्वासाने, त्या दानाबरोबर जे देवाने मला दिले आहे. येथे आहे जे काही मी म्हणालो, जेणेकरुन तुम्ही ते समजाल. मी म्हणालो, "जर पेत्र फक्त आत आला असता, किंवा त्यांच्यापैकी कोणी एक." तसे म्हणू नका ... तुम्हाला माझ्यासाठी प्रार्थना करायची गरज नाही. फक्त अशाप्रकारे आत ये, आणि म्हण, जसे या स्त्रीला, म्हण, "तू बहीण अमुक आणि अमुक आहेस?" (तुझे नाव काय आहे? बहीण हावर्ड.) म्हण, "तू बहीण हावर्ड आहेस. तू विश्वासू आहेस, बहीण हावर्ड? तू ... तू विश्वासू आहेस. मग, तुम्ही पहा, तुम्हाला सर्व उद्धाराच्या आशिर्वादांवर अधिकार आहे." मग मी म्हणालो असतो, "बहीण हावर्ड, सर्वकाही ठीक होईल," आणि निघून जाईन. ओह, कसे.... मी म्हणालो, "मी ओरडेन, मी किंचाळेन." मी म्हणेन, "प्रभू, ते होणेच आहे. ते अगदी होणेच आहे."

आणि मी विचार केला, "काय जर लोक तोच विचार करतील जेव्हा मी त्यांच्यासाठी प्रार्थना करीन?" तेव्हा तेच काय.... तुम्ही पहा मला काय म्हणायचे आहे?

83 आणि मी, कित्येक वेळेस, उभा राहिलो आहे, आणि लोकांना घेतले आहे, आणि म्हणालो, "ओह, मूल्यवान बहीण, तू ते विश्वास करशील का? ओह, तू ते विश्वास करशील का? प्रभू, हे देवा, त्यांनी त्यावर विश्वास करावा असे कर. त्यांना त्यावर विश्वास करु दे. ओह, कृपया, आता तुम्ही ते स्वीकाराल का?" ते तसे नाही. मी त्यातून पार गेलो आहे. मी त्यापासून दूर गेलो आहे.

मी फक्त हे म्हणतो, "बहीण हॉवर्ड, तू विश्वासू आहेस?"

"होय, मी आहे."

"ठीक आहे, बहीण हॉवर्ड, जर तू विश्वासू असशील, जे काही देवाचे आहे त्याची तू वारस आहेस." आणि फक्त तिचा हात घेतो. पहा, मी ते विश्वास करतो. मी बहीण हॉवर्डवर हात ठेवण्याद्वारे तिच्याशी संपर्क करतो. येशूने कधी नाही सांगितले "त्यांच्यासाठी प्रार्थना करा"; तो म्हणाला तुम्ही केवळ तुमचे हात त्यांच्यावर ठेवा. बस एवढेच, आणि ती बरी होते. बहीण हॉवर्ड, सर्वकाही ठीक होईल. मग तुम्ही घरी जाऊ शकता आणि बरे होता. देव तुम्हाला आशीर्वादित करो.

84 तू बहीण...? बहीण हॅम्पटन, तू विश्वासू आहेस, तू नाहीस का? जे काही त्याचे आहे त्याची तू वारस आहेस. देव तुझ्याबरोबर असो, बहीण हॅम्पटन. जा विश्वास कर. आता तू घरी जाऊ शकतेस आणि बरी हो. येशू ख्रिस्त तुला बरे करील. आमेन.

तू बहीण? स्लॉग. भाऊ जॅक... तू ती स्त्री आहेस जिच्यासाठी त्या दिवशी आम्ही दवाखान्यात प्रार्थना केली होती. मग तू विश्वासू आहेस, बहीण स्लॉग, जे काही आपल्याकडे आहे त्या सर्वांची वारस. बहीण स्लॉग, तू जे काही मागितले आहेस ते तुला मिळो आणि बरी हो. देव ते तुम्हा मान्य करो.

भाऊ जेन, तू विश्वास करतोस की देव तुला बरे करील? आणि परमेश्वर देव तुला, जेन, जे काही तू मागितले आहे, ते तंतोतंत देईल...?...

आता मला तू ठाऊक आहेस. ठीक आहे. तू सुवार्तिक आहेस, बहिणी. मला तू ठाऊक आहेस. हा तुझा येथे पती आहे. तो एक आहे ज्याच्यासाठी त्या दिवशी मी दूरध्वनीवर प्रार्थना केली. मी ते नेहमी लक्षात ठेवीन. टल्सामध्ये सभेला जाऊ शकला नाहीस. सभेला आला, आणि परमेश्वराने त्याला बरे केले, आणि त्याला सभेला पाठविले. प्रतिनिधी म्हणून तू आणखीन कोणासाठी तरी उभी राहिलीस, बहिणी, काय ख्रिस्ती गोष्ट आहे ती. पहा, तो देखील प्रतिनिधी म्हणून होता की तो आपणा सर्वांसाठी उभा राहिला. तू विश्वासू आहेस आणि देवाने ज्या कोणत्या गोष्टीचे अभिवचन दिले आहे त्या सर्वावर तुला अधिकार आहे. मी त्याचा दास आहे. आणि येशू ख्रिस्ताच्या नावाद्वारे मी तुला जे काही हवे आहे ते देतो...?...

85 ये, भाऊ बिल. देव तुला आशीर्वादित करो. तुझ्याशी फारच चांगला आहे. तू विश्वासू आहे; मला ठाऊक आहे तू आहेस. मी विश्वास करतो की देव तुला सर्वकाही देईल जे काही तू मागशील, कारण तू विश्वासू आहेस. आणि त्याचा दास म्हणून, तुला, माझ्या भावा, येशू ख्रिस्ताच्या नावात मी तुला तुझ्या हृदयाची इच्छा देतो. आता जा आणि ते स्वीकार. देव तुला आशीर्वादित करो.

बहीण ब्रूस, मला तू ठाऊक आहेस. लहानशी परिचारिका जी माझ्या पाठी होती आणि तू. ती जे, जे, ट्विन जे, किंवा त्याच प्रमाणे काहीतरी हॉटेलात खाली असायची. तू इतरांसाठी उभी असायचीस. आणि तुझी इच्छा काय आहे जेव्हा पित्याला विचारायचे? आज रात्री तुझ्यासाठी... मग शत्रूने तुला वैद्य पोहचण्याच्या पलीकडे फेकले आहे; परंतु मी गोफण घेऊन तुझ्या पाठी येतो. आणि येशू ख्रिस्ताच्या नावात

मी गोफण नेम घेरतो थेट - तो दगड जो मूत्रपिंडात आहे आणि अडथळा स्थिती, आणि तुला परत पाठी आणतो...?... (पहा?) आता, आणि तुला आशीर्वादित करतो, येशू ख्रिस्ताच्या नावाद्वारे. आमेन.

86 ...?... आपल्या पित्याचे नाव, महाशय. तू विश्वासू आहेस? ते तुझ्या बाजूमध्ये दुखत आहे, खाली आणि डाव्या बाजूला... तू विश्वास करतोस की देव तुला ते देईल, महाशय? आणि तो त्याचा दास आहे. प्रभू, ह्या हाताने कदाचित कित्येक कठीण दिवसाची कामे केली असतील, येथे काही हेतूने आला असेल, काहीतरी करण्यासाठी. पित्या, त्याच्या हृदयाची इच्छा त्याला दे, जसे मी येशूच्या नावात प्रार्थना करतो की तू देशील. आमेन.

संशय घेऊ नको; ते दुखण्याचे थांबेल तेथे खाली दुखण्याचे, आणि तू बरा होशील. भावा, देव तुला आशीर्वादित करो...?...

तू विश्वासू आहेस, नाही का? तू विश्वासू आहेस, आणि तू - तू या सर्व आशीर्वादांचा वारस आहेस. आभारी आहे. पिता, मी या माझ्या बहिणीला या रांगेत आणतो...?... या निशाण्याच्या मध्यभागी, आणि शत्रूच्या तावडीतून, येशू ख्रिस्ताच्या नावात, मी तिला परत तुझ्याकडे आणतो. आमेन. अगदी त्याच प्रकारे ते होईल.

तुला शस्त्रक्रिया नको आहे. हे परमेश्वरा, जशी ही तरुण स्त्री येथे उभी आहे, अजूनही तारुण्याच्या बहरात, मी तिच्यासाठी प्रार्थना करतो, आणि फुफुस जे बाहेर काढणे आहे, आणि तिच्या पूर्ण आयुष्यात ती वाकलेली अशी होईल. तू आमचा पिता आहेस, आणि मी अग्नीच्या प्रार्थनेचा अगदी तिच्यावर नेम धरतो, प्रभू, अगदी सरळ त्या फुफुसावर. मी ही प्रार्थना येशू ख्रिस्ताच्या नावात पाठवितो; ते तशा प्रकारे असू दे...?... येशू ख्रिस्ताच्या नावात...?... आमेन.

87 तू ख्रिस्ती आहेस? बहीण डर्ड...?... डोके माझ्यापासून काढून घेतले. तू विश्वासू आहेस आणि देवाच्या सर्व आशीर्वादांची वारस आहेस, बहीण डर्ड. परमेश्वरा, मी या लहानशा गोफणाबरोबर जी तू मला दिली आहे तिला तुझ्याकडे आणतो. जशी तू दाविदाला गोफण दिली त्याच्या पित्याची मेंढरे राखण्यासाठी, आणि जर शत्रू आतमध्ये आला मेंढरापाठी, तो घाबरला नाही; त्याने ती लहानशी गोफण पकडली आणि सिंहाच्या आणि - आणि अस्वलाच्या मागे गेला, आणि त्याने मेंढराला परत आणले. ही विश्वासाची प्रार्थना आहे. तू मला सांगितले की जर मी लोकांना विश्वास करावयास लावीन आणि प्रामाणिक असेन... मी आज रात्री बहीण डर्डला परत आणतो. मी शत्रूच्या हातून तिला खेचून आणतो. ती तुझे मेंढरु आहे. मी तिला पित्याच्या कळपात परत आणतो, येशू ख्रिस्ताच्या नावात. आमेन.

बहीण लोवे, उच्च रक्तदाब... आणि तू विश्वासू आहेस, तू आहेस, बहीण लोवे, सर्व आशीर्वादांची वारस? मग, देव पित्या, आज रात्री मी ही प्रार्थना देवाकडून मिळालेली गोफण म्हणून बहीण लोवेच्या उच्च रक्तदाबाकडे नेम धरतो. पुढच्या वेळेस जेव्हा वैद्य रक्तदाब तपासेल, त्याने तिच्याकडे पाहून, सांगावे, "आता तो सामान्य आहे." तिला कळेल की ते कशाने केले. येशू ख्रिस्ताच्या नावात मी ते तिला देतो. आमेन.

88 होय... मी इच्छा करतो की माझे वडील आज रात्री येथे असावयास हवे होते की मी त्यांच्यासाठी आताच प्रार्थना केली असती. मी इच्छा करतो की तुमच्यासाठी देखील. मी समजतो.

स्वर्गीय पित्या, मनुष्य ज्याने या मुलाला जन्म दिला, की तो आज रात्री येथे त्याच्यामुळे पृथ्वीवर आहे. आणि त्याचा स्वपुत्र इच्छा करतो की त्याच्या पित्याला परत मागे आणले जावे, त्या पलीकडच्या पापाच्या, दारुच्या जगातून. हे परमेश्वरा, मी ही प्रार्थना विश्वासाने आणि सामर्थ्याने पाठवितो, आणि जे काही मी फेकू शकतो, ही - ही लहानशी गारगोटी प्रभू येशूच्या नावात, मी त्या सैतानाकडे गोफण फिरवितो ज्याने ते टाकले आहे...?... तेथे...?... आणि तो येशूच्या नावात सुरक्षितपणे कळपात यावा. आमेन. आमेन.

तुला देखील इच्छा आहे? तुला त्या भूमीमध्ये यावयाचे आहे जेथे सर्व अभिवचने आहेत. आता, प्रभू, हा मुलगा हा अगदी नदीच्या पलीकडे आहे, दुसऱ्या बाजूला छावणी दिलेली आहे आणि यार्देन दुथडी भरुन वाहत आहे. आणि तू मार्ग बनविल्याशिवाय जसा तू यहोशवा आणि इस्राएलासाठी बनविला, तेथे ओलांडण्यासाठी मार्ग नाही. आणि, पित्या, मी तुला, तुझा दास म्हणून, मागत आहे; आमच्या मूल्यवान भावाला, हे देवा, त्याला या अभिवचनाच्या भूमीत प्रवेश करु दे, हे अभिवचन जे दुसऱ्या बाजूला आहे जसे मी ते त्या रात्री वाहिले... मला माझे हात पुढे करण्याचे आणि मिठी मारण्याचे सौभाग्य प्राप्त होऊ दे त्याच्या भोवती त्या दुसऱ्या भूमीत, म्हणत, "माझ्या मौल्यवान भावा." ते मान्य कर, प्रभू. त्याला देवाचे अभिवचन प्राप्त होवो, पवित्र आत्मा. आमेन.

89 हे देवा, हा माझा कृपाळू भाऊ आहे. हा हात माझ्यासाठी दयेचा झालेला आहे, आणि अगणित वेळा माझ्यासाठी उभा राहिलेला आहे. तो विश्वास करतो आणि विश्वास आहे. आणि आता, शत्रू मिठीत घेण्याचा प्रयत्न करीत आहे, या माझ्या मित्राला. मधुमेह... आणि तो विचार करतो की - तो या मुलाला पकडू शकतो; परंतु त्याच्यापाठी मी येतो. मी तुझ्या स्वकीयांना परत आणण्यासाठी येत आहे, प्रभू, येशू ख्रिस्ताच्या नावात ह्या गारगोटीचा विश्वासात नेम धरतो, मी त्या मधुमेहाशी युद्ध करतो तो...?..., तुझ्या स्वतःच्या मेंढराला कळपात परत आणतो, पित्या, येशूच्या नावात. आमेन.

ग्रंथी... हे प्रभू, आमच्या बहिणीला ठाऊक आहे की हा स्थूलपणा आहे, तेव्हा वैद्य म्हणतो, ही गोष्ट जी मारुन टाकिते. प्रत्येक पाउंड स्थूलपणा एक वर्ष कमी करते, विम्याच्या तक्त्यानुसार. आणि तिला देवाच्या सन्मानासाठी आणि स्तुतीसाठी जगायचे आहे. देव पित्या, तेथे कोणता वैद्य नाही जो हे करु शकतो; हे केवळ - तुझ्या हातात आहे. आणि बहीण बेल ही फार विश्वासयोग्य राहिली आहे, आणि ती दयाळू आणि विचारशील अशी आहे...?... ती कित्येक गहन परीक्षेतून गेलेली आहे; मी आज रात्री तिच्यासाठी येत आहे, प्रभू. मी पलीकडे त्या शत्रूला भेटण्यासाठी येत आहे. आणि मी सर्व अचूकतेने जेवढ्या मी करु शकतो नेम धरतो; येशू ख्रिस्ताच्या नावाने तो विश्वासाचा दगड फेकतो या शत्रूवर ज्याने तिला घेरले आहे. याने त्याला विखरु दे, आणि तिच्याकडून त्याला दूर पळवू दे, आणि ती परत एकदा सावलीतील हिरव्यागार

कुरणात आणि संथ पाण्यावर पुनःस्थापित होऊ दे, येशू ख्रिस्ताच्या नावाद्वारे. आमेन.

ते होईल, बहीण बेल. फक्त शंका घेऊ नको.

90 बहीण स्पेन्सर? [एक बहीण साक्ष देते]...?... मी नक्कीच करतो बहिणी...?... देव तुला आशीर्वादित करो. आमेन...?... प्रियजन वाचलेले आहेत...?... होय, महाशय, मला त्याबद्दल सर्वकाही ठाऊक आहे. आपण सर्व त्यावर दावा करतो, बहीण स्पेन्सर, आणि माहिती आहे की कशी ती आणि भाऊ जेसी हे त्यातून जात आहेत...?... येथे मंडळीमध्ये खाली येणे. जेव्हा मी दुसऱ्या बाजूला ओलांडतो, ते अशा प्रकारे धडपडणार नाहीत; ते तरुण असतील, ओह, भाऊ जेसी...?... ते सर्वकाही. तुम्हाला ठाऊक आहे कसे अगदी - फक्त पलीकडे लहानसे...?... पलीकडे, जेथे परत तू सुंदर तरुण मुलगी असशील, आणि भाऊ जेसी तरुण मुलगा असेल. देवाने तुम्हाला अभिवचन दिले आहे.

आता, पहा. मला तुला अगदी एक लहानशी शिकवण द्यायची आहे, कारण की येथे तू शेवटची आहेस. मला घ्यायचे आहे... कारण मला माहित आहे हा तुझा लहान मुलगा, चार्ली आहे. तुला प्रार्थना करुन घ्यायची आहे...?...

91 मला ही एक गोष्ट सांगावयाची आहे. तुम्ही कधी शास्त्रलेखात वाचले जेथे पवित्र शास्त्र असे म्हणते? पौलाने रोमन शताधिपतीला सांगितले (तुम्ही मला ठीक ऐकू शकता का?), रोमनला सांगितले जेव्हा त्याने तलवार उपसून स्वतःला ठार करण्यास पाहिले फिलिप्पैमध्ये जेव्हा तो बंदीखान्यात होता. आणि एका भूमिकंपाने बंदिशाळेचे पाये डगमगले. तो म्हणाला, "प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेव, म्हणजे तुझे व तुझ्या घराण्याचे तारण होईल." तुम्ही कधी ते ऐकले काय? "तू आणि तुझे घराणे..."

आता, पहा. जर तुमच्याकडे तुमच्या स्वतःच्या तारणासाठी पुरेसा विश्वास असेल, तर तुमच्या मुलासाठी देखील तुमच्याकडे पुरेसा विश्वास असू शकत नाही? देव कोणत्यातरी मार्गाने...?... आणि परमेश्वरा, मी आज रात्री बहीण स्पेन्सर व भाऊ स्पेन्सरसाठी प्रार्थना करतो, की प्रत्येक मूल - ते आणि त्यांची मुले सर्वजण त्या गौरवी आनंदी भूमीमध्ये असतील जेथे तेथे आजार नसेल किंवा म्हातारपण नसेल, दुःख नसेल किंवा निराशा नसेल, आणि हे सर्व येथील लहानसे जीवन हे त्या दुःस्वप्नात धूसर होईल जे निघून गेले आहे. त्यांनी हे स्वीकारु दे, आणि तिची सर्व लेकरे, आणि तिचा पती, तिचे सर्व प्रियजन, आणि ते सर्व ज्यांनी तिला प्रेम केले, आणि ते सर्व ज्यांना तिने प्रेम केले, ते तेथे तिच्याबरोबर असोत, येशूच्या नावात. बहीण, देव तुला आशीर्वादित करो. ब्याऐंशी वर्ष वयाची. तू खाली जात आहे...?... अगदी जसे जग विभक्त होत आहे, बहीण स्पेन्सर.

92 बरे, तू अगदी विश्राम करण्यास जाण्यासाठी तयार आहे, तू पहा...?... सर्वदा...?... अगदी-अगदी तुझा विश्वास सरळ त्याच्यामध्ये ठेव...?... तू ओलांडून जाशील...?... आणि अगदी इतके निश्चितपणे जसा मी येथे या वेळेस उभा आहे...?... आज रात्री, बहीण स्पेन्सर, त्याच्या कृपेने मी तुला आणि जेसीला पलीकडच्या तीरावर पाहीन, तरुण आणि स्वतंत्र. तुम्ही सर्व धावत असाल, ओरडत असाल, "माझा भाऊ, माझा भाऊ." मी तुम्हाला पाहीन.

त्या तिच्या नसा आहेत. देव पित्या, ही मुलगी भंग पावली असती, आणि ती पोहचणार होती...?... फक्त अशी...?... काय अडथळा करीत आहे. परंतु मी आज रात्री तिच्यासाठी येत आहे. पित्या, मी तुझ्याकडे येत आहे. मी तुझ्याकडे येऊन नेम निर्देश करायला सांगत आहे की मी गोळी झाडावी. ती तंतोतंत निशाण्याला लागावी, त्याच्या योग्य जागी नेम लागावा...?... त्या मानसिक तणावाच्या ठिकाणी ह्या येशू ख्रिस्ताच्या नावातील प्रार्थनेने प्रहार करावा आणि तिला तुकड्यात फाडावे, देवाच्या कुरणात मेंढराला परत आणावे. आमेन. ते अगदी आताच व्हावे, प्रिये...?...

स्वर्गीय देवा, मान्य कर की तिची सहा मुले ज्यांची ती इच्छा करते की तारली जावी... तिने भाऊ डाल्टनची साक्ष ऐकली आहे, त्याच्या प्रेमळ मुलींची. ती तिच्या सहा मुलांची इच्छा करते, पित्या. तिला ती मिळू दे. त्या भूमीमध्ये ती तिला भेटू दे जेथे तेथे रात्र नाही, येशू ख्रिस्ताच्या रक्ताद्वारे सुरक्षित आणि आश्रयाला आलेली. आमेन. बहीण, तू ती घेऊ शकते, ही माझी प्रार्थना आहे.

93 मी विश्वास करतो. तेथे महत्प्रयासाने काही नाही जे सहाय्य करु शकते: ते त्यांना लहानशी गोष्ट देतात जे असे दिसते - ओह, काहीतरी जसे असिटोमीन; ते एक... कोर्टिसोन आहे, ते त्याला संबोधतात, आणि ते - ते तुम्हाला तरीही ठार करते, तुमचे रक्त फाडते तेव्हा...?... परंतु... पहा तो संधिवात हा सिंहासारखा आहे जो मेंढराला पकडतो आणि पळून जातो. आता, गोफण काय करील? ओह, माझ्या, तेथे मोठा गर्जणारा सिंह मेंढराबरोबर आहे. आणि त्याला मेंढरु आवडते, म्हणून तो मेंढराला घेऊन पळून जातो; परंतु दाविदाने गोफण घेतली आणि त्याच्या मागे गेला. पहा, आता पहा. त्याच्याकडे पाच दगड होते: विश्वास[f-a-i-t-h], स्वतःमध्ये, मध्ये[i-n]. त्याची गोफण त्याच्या हातात होती: येशू[J-e-s-u-s]. तो निशाण्यात अचूक होता. काहीतरी घडावयास हवे; आज रात्री या प्रार्थनेद्वारे त्या संधिवातामागे जाऊया, देव तुला ते देवो.

तिला या नावात बाप्तिस्मा घ्यायचा आहे... तुला तिचा बाप्तिस्मा व्हावा असे वाटते...?... धन्यवाद, बहीण. यासाठी नाही की तो मार्ग आहे...?... ते यासाठी नाही की... आता, जर पवित्र शास्त्रामध्ये पिता, पुत्र, आणि पवित्र आत्म्यासाठी असते, मी-मी त्यामध्ये विश्वास केला असता आणि त्याबरोबर सरळ राहिलो असतो तू पहा. मला-मला काहीतरी वेगळे व्हायचे नाही. मला-मला-मला ते हवे आहे...?... मला ते नव्हे... मी-मी त्यासाठी जबाबदार असणार आहे. तुम्ही पहा? आणि मला ते अगदी ज्या प्रकारे सांगितले गेले तसे सांगायचे आहे, वेगळे असण्यासाठी नाही, परंतु प्रामाणिक असण्यासाठी.

94 आता, पित्या, आम्ही तिच्या प्रियजनांसाठी आलेलो आहोत. तिला संधिवात आहे आणि येथे तिला प्रभू येशूच्या नावात तिचा बाप्तिस्मा

करावयाचा आहे, कारण तो प्रवेश आहे; तो उघडा दरवाजा आहे. तोच जो एक मार्ग आहे जो यहोशवाने उघडला जो वचनदत्त देशात ओलांडला गेला. तेथे दोन किंवा तीन स्थळे उघडली गेली नाहीत; तेथे केवळ एक होते.

पेत्र, पेन्टिकॉस्टच्या दिवशी, जेव्हा मंडळीचे पहिले उदघाटन झाले, मार्ग उघडला गेला, म्हणाला, "तुमच्यातील प्रत्येकाने पश्चाताप करा, आणि येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या." त्या पथापासून ते कधीही भटकले नाहीत; प्रत्येकाने वचनदत्त देशात प्रवेश केला. त्यांच्यातील काही दुसऱ्या दुर्गाच्या मार्गाने ओलांडण्याचा प्रयत्न करीत होते, आणि पौल त्यांना म्हणाला, "तुम्ही कोणता बाप्तिस्मा घेतला? तुम्ही कोठून पलीकडे जाण्याचा प्रयत्न करीत आहात?"

आणि ते म्हणाले, "येथे खाली जेथे योहानाने पाहिले."

तो म्हणाला, "बरे, योहानाने केवळ काळ आणि स्थळाकडे निर्देश केला." आणि मग जेव्हा त्यांनी हे ऐकले, त्यांचा योग्य दुर्गामध्ये बाप्तिस्मा झाला, आणि ते...?... आत्म्याच्या जीवनामध्ये पार गेले.

आमच्या बहिणीला आणि तिच्या प्रियजनांना, ते येशू ख्रिस्ताच्या नावात, मान्य कर. आमेन.

95 भाऊ लायली... ओह... होय...?... ते आणि दृष्टांत त्याने दिला...?... आता ते संपलेले आहे तरीही. देव तुला आशीर्वादित करो. भावा, आता तू वचनदत्त देशाच्या मार्गावर आहेस...?...

येथे किती जणांना लक्षात आहे ही सेवा मला दृढ होण्याच्या थोड्या अगोदर आणि एक दिवस मी एका माणसाबरोबर मासेमारी करीत होतो, तेथे खाली नदीवर, तलावावर? आणि मी लहानसे मासे पकडीत होतो, आणि पवित्र आत्मा माझ्यावर आला. तेथे... हा मनुष्य, यहोवा विटनेसचा होता. त्याचा भाऊ येथे कुठेतरी आहे, बॅंक्स वूड. तो येथेच कुठेतरी आहे, जो माझा शेजारी आहे. हा लायली आहे. आणि हे लोक यहोवा विटनेसचे होते. आणि ते एक दिवस म्हणाले जेव्हा आम्ही तेथे खाली मासेमारी करीत होतो त्या मुलाचे परिवर्तन झाल्यानंतर, मी त्याला सांगितले की तेथे त्याच्या जीवनात काहीतरी होते, आणि जे काही घडले, आणि त्याबद्दल सर्वकाही, जे त्याने मला आताच सांगितले, आणि त्याने ते आताच त्याच्या जीवनातून काढून टाकले आहे. ते बरोबर आहे. परमेश्वराची स्तुती असो. ते तंतोतंत बरोबर आहे. त्याचा पिता तो एक होता जो एक - एक वाचक होता. आहे...?... इमारतीमध्ये? आणि तो आणि त्याच्या पत्नीचा येशू ख्रिस्ताच्या नावात साक्ष देण्यासाठी या पुलामध्ये बाप्तिस्मा झाला होता. आणि हा मनुष्य, माझ्या बंधूंच्या बाजूला बसलेला होता.

96 बॅंक्स, तू कोठे आहेस? तो आतमध्ये आहे का? मागे कोपऱ्यामध्ये. होय. आणि आम्ही मासेमारी करीत होतो. आणि भावा, माझ्या लहान मुलाने ठार केले होते... मी विचार केला त्याने काही दिवसा अगोदर मांजरीच्या पिल्लाला ठार केले होते. एका लहानशा म्हाताऱ्या मांजर आईला घोळकाभर पिल्ले झाली होती आणि त्याने ते उचलले आणि खाली टाकले. आणि मी विचार केला... आणि मी म्हणालो, "परमेश्वर लहानसे जीवन - वर जिवंत करणार आहे, एका दिवसा अगोदर. लायली, ते बरोबर आहे का? तेथे गारठ्यात उभा आहे. आणि मी म्हणालो, "ते हे परमेश्वर असे म्हणतो आहे."

आणि रात्रभर आम्ही मासेमारी केली आणि काहीही पकडले नाही. दुसऱ्या सकाळी, लहानशा ब्लुगिलसाठी खाडीमध्ये आम्ही मासेमारी करीत होतो; तो लहान मासा आहे. आणि भाऊ लायलीकडे मोठी काठी होती, आणि त्याने लहान ब्लुगिलला त्याच्याकडे असलेला मोठा आकडा गिळू दिला, तोपर्यंत जेव्हा त्याने तो खेचून काढला, लहानसा धागा खालपर्यंत गेला होता, मोठा आकडा लहान ब्लुगिलच्या पोटात होता. आणि जेव्हा त्याने तो बाहेर खेचून काढला, त्याला अगदी सर्वकाही, आतडी लहानशा ब्लुगिलच्या पोटातून खेचून काढावी लागली तो आकडा घेण्यासाठी आणि अगदी सर्वकाही बाहेर खेचावे लागले, कारण मोठा आकडा माशाच्या पोटात रुतून बसला होता. आणि जेव्हा त्याने ते केले, त्याने त्याला पाण्यावर फेकून दिले, आणि तो चार किंवा पाच वेळेस अगदी थरथरला, आणि बस एवढेच; कारण त्याची आतडी आणि त्याचे कल्ले त्याच्या तोंडातून बाहेर लटकत होते. आणि सुमारे अर्धा तास तो सभोवती तरंगत होता, झुडुपांत तरंगत होता.

97 आणि मी येथे मासेमारी करीत बसलेलो होतो, आणि अचानक पवित्र आत्मा आला, म्हणाला, "त्या माशाला बोल."

मी म्हणालो, "लहान माशा, येशू ख्रिस्त तुला तुझे जीवन परत देतो," आणि तो लहान मासा, पाण्यावर मेलेला पडलेला होता, त्याच्या बाजूला वळला आणि र्र्र्ट्ट करीत गेला, जेवढा जलद तो जाऊ शकत होता त्या पाण्यात गेला.

भाऊ लायली, भाऊ वूड हे आता येथे बसलेले आहेत उपस्थित आहेत. भाऊ लायली म्हणाला, "भाऊ ब्रॅन्हम, ते माझ्यासाठी होते कारण मी त्या लहानाला म्हणालो...?... म्हणाला, "मी-मी नाही...?..." तो म्हणाला, जेव्हा त्याने त्याच्यामधून आतडी बाहेर खेचली आणि त्याला तेथे बाहेर फेकले, म्हणाला, "लहानशा माशा, तू तुझ्या शेवटचा श्वास घेतलास," अगदी अशा प्रकारे. त्याला बाहेर फेकले, तो म्हणाला, "ते-ते माझ्यासाठी होते."

आणि मी म्हणालो, "नाही, भाऊ लायली, ते त्यासाठी नव्हते."

भाऊ बॅंक्स मागे तेथे म्हणाले, "त्या जगामधील कितीतरी लोक, कितीतरी हजारोंना, येथे उभे राहायला आवडले असते जेथे आम्ही आता प्रत्यक्ष उभे आहोत देवाचे सामर्थ्य पाहण्याकरिता खाली आले आणि अशा प्रकारे काहीतरी सादर केले?" दुसऱ्या शब्दात, तो जसा काही... मी विश्वास करतो आम्हा सर्वांना पेत्रा सारखे वाटले जसे त्याने केले, "येथे असणे बरे आहे. तीन मंदिरे उभारुया." ते बरोबर आहे.

98 आता, भाऊ लायली, आता तू पवित्र आत्म्याने अभिषिक्त आहेस. तू मिसर सोडलेले आहे; लसणाचे भांडे आणि जगाची घाण मागे

सुटलेली आहे. आता तू यार्देनच्या किनाऱ्यावर उभा आहेस, अगदी ओलांडण्या पलीकडे. देव तुला पलीकडे घेऊन जावो.

सर्वसामर्थी देवा, येथे तुझे पारितोषिक आहे. तो नक्कीच भयंकर स्थितीत असता, परमेश्वरा, परंतु माझे हृदय त्याच्या मागे गेले. आमच्या प्रार्थनेने अगदी शीत वाऱ्याला प्रहार केला, कारण प्रत्यक्ष गोष्ट ज्याने त्याला धरुन ठेवली होती ती त्याच्यापासून गेली आहे. ती चिरडली गेली आहे, आणि आता तो यार्देनेमध्ये चालत आहे. त्याला वचनदत्त देशात ने, प्रभू, आणि लोकांमध्ये त्याला मुद्रित कर, की त्या गौरवी दिवशी जेव्हा आम्ही पलीकडे भेटू, मला त्याच्या बाहुंचा उबदारपणा ओरडताना जाणवू दे, "माझ्या मूल्यवान भावा." आणि मला ठाऊक आहे...?... बॅक्सला त्याच्याबरोबर आण, प्रभू, तू आणशील? वडील, आई, आणि ते सर्व, बहीण, आणि ती सर्व महान कुटुंब. आम्ही सर्व पलीकडे भेटू दे, प्रभू, आणि त्यांच्यातील प्रत्येक जण पवित्र आत्म्याने भरला जावो. मी येशूच्या नावात प्रार्थना करतो. आमेन.

तू ते स्वीकारशील, भावा. देव तुला आशीर्वादित करो, भावा. होय, भावा...?...

99 तेथे कोणीतरी दूर अंतराच्या हाकेवर मरत आहे; मी सेवा भाऊ नेविलकडे वळवितो जेव्हा...?...

[भाऊ नेविल बोलतात आणि विसर्जनाच्या प्रार्थनेत श्रोत्यांचे नेतृत्व करतात. भाऊ ब्रॅन्हम परततात आणि बोलतात]

एक तरुण प्रचारक उपदेशमंचावर मरुन पडला...?... तेव्हा आम्ही विश्वासाचा दगड पाठविला...?... आज रात्री मान्य कर...?... तो एक अद्‌भुत मनुष्य होता, कारण मी त्याच्यापाठी प्रार्थना पाठविली, येशू ख्रिस्ताच्या नावात...?... ही घडी आहे जेव्हा त्याची नाडी...?... त्याच्यामधून निघून गेली...?... त्याची नाडी...?... डोळे त्याच्या डोक्यात बसले...?... उपदेशमंचावर पडला...?...

हे अजूनही उघडे आहे? मी तुमचे लक्ष वेधून घेऊ शकतो का?...?... एक तरुण सुवार्तिक, एक प्रचारक इंडियानामध्ये प्रचार करीत होता, उपदेशमंचावर मरुन पडला अगदी सुमारे एका तासा अगोदर, तो प्रचार करताना पुढे पडला, आणि उपदेश मंचावर मेला, एक ख्यातनाम सुवार्तिक, इंडियानामध्ये प्रचार करीत होता. पाळक लगेच आला आणि मला बोलाविले. तो सरळ आत्म्याच्या अभिषेकाखाली असताना प्रचार करताना मेला, पुढे पडला, त्याचे डोळे स्थिर झाले, त्याच्या श्वासोश्वासाने त्याला सोडले. तो मृत म्हणून घोषित केले, एक तासासाठी मृत म्हणून पडलेला होता. आणि कोणीतरी त्यांना मंडळीला फोन करण्यास आणि मला प्रार्थना करण्यासाठी सांगितले. म्हणून त्याला मागे परत आणण्यासाठी प्रभू येशूच्या नावात मी प्रार्थना पाठविली.

तुम्ही माझ्याबरोबर विश्वासाद्वारे सामील व्हा, की ती निशाणा चुकविणार नाही, परंतु...?... आणि त्याला परत मागे आणले. धन्यवाद. देव तुम्हाबरोबर [ध्वनिमुद्रणपट्टीवर रिक्त स्थान] असो तुम्हाला मी बुधवार रात्री पाहीपर्यंत. आणि तुम्ही जॉर्जिया आणि सभोवतालचे लोक, बाय - बाय. देव तुम्हाबरोबर असो. भाऊ पाळक...

[भाऊ ब्रॅन्हम इतरांसाठी प्रार्थना करतात आणि बोलतात]... आणि मी हे अर्पण करतो...?... येशू ख्रिस्ताच्या नावात. आमेन...?... [शब्द समजण्यास सोपे नाहीत] एवढेच सर्व तुम्ही एकत्र आहात?...?... [भाऊ ब्रॅन्हम लोकांना अभिवादन करतात] पत्राकरिता धन्यवाद. तुम्हा सर्वांना भेटल्याबद्दल आनंदित आहे तुम्ही येथे...?... तुम्हाला पाहणे खूप चांगले आहे...?... ओह, ते बरोबर आहे? [शब्द समजण्यास खूप सोपे नाहीत]...?... तुम्हाला पाहणे खूप चांगले आहे. तुम्ही कसे आहात? भावा तू कसा आहेस? होय, मी... काय म्हणालास? ते चांगले आहे. अद्‌भुत. आता, त्यांच्याकडे विशेष जागा आहे...?... तू आज सकाळी येथे होतास?...?... चांगले. मी खूप आनंदित आहे. ते खरोखर चांगले आहे बहिणी...?... देव तुला आशीर्वादित करो आणि तुझ्या पतीला आणि लहान मुलांना. अलविदा प्रिये. देव तुला आशीर्वादित करो प्रिय. धन्यवाद महाशय, धन्यवाद. मी खूप आनंदित आहे की तू येथे होतास. तुझ्याबरोबर असणे आणि तुझ्याबरोबर उपासना करणे याचा देखील मी आनंद घेतला...?...

Sermons By
विल्यम मॅरियन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे प्रचार केले गेलेले उपदेश
"...वाणी होईल त्या दिवसात..." प्रकटी. १०:७

www.messagehub.info